दैनिक

जनप्रभात

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मुख्य संपादक :- राहुल गजरे

कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

✻ (आष्टी) वर्धा ✻ शनिवार, दि. २६ जुलै २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक २५६ ✻ पृष्ठ ६ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2022/82242

उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी आयोगाची तयारी सुरू; निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

मुंबई : भारताच्या उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीच्या आवश्यक प्रक्रियेसाठी भारत निवडणूक आयोगाने नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. संविधानातील अनुच्छेद ३२४ नुसार, उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीचे आयोजन करणे ही निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे. या निवडणुकीसाठी 'राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती निवडणूक अधिनियम, १९५२' आणि त्याखालील 'नियम, १९७४' लागू होतात. या अधिनियमाच्या कलम ३ नुसार, निवडणूक आयोग केंद्र सरकारच्या सल्ल्यानुसार निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करतो, ज्यांचे कार्यालय नवी दिल्ली येथे असते. याशिवाय, एक किंवा अधिक सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारीही नियुक्त केले जाऊ शकतात. परंपरेनुसार, लोकसभा किंवा राज्यसभा सचिवालयाचे महासचिव हे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून आलटून पालटून नियुक्त केले जातात. मागील उपराष्ट्रपती निवडणुकीसाठी लोकसभा सचिवालयाचे महासचिव निवडणूक निर्णय अधिकारी होते. त्याअनुषंगाने, आगामी उपराष्ट्रपती निवडणुकीसाठी राज्यसभा सचिवालयाचे महासचिव यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती कायदा व न्याय मंत्रालयाच्या सल्ल्यानुसार आणि राज्यसभेचे उपसभापती यांची संमती घेऊन करण्यात आली आहे.

राज्यातील विकास प्रकल्पांसाठी मुख्यमंत्र्यांच्या दिल्लीत अनेक नेत्यांच्या भेटी

अमित शाह, राजनाथसिंह, जे. पी. नड्डा, मनोहरलाल खट्टर, निर्मला सीतारामन, शिवराजसिंह चौहान, नीती आयोगात भेट

गावांना सिमेंट रस्त्यांनी जोडणार, सांडपाणी प्रक्रिया, बांबू क्लस्टर, विदर्भात खतांचा प्रकल्प, एनसीडी स्क्रिनिंगसाठी एआय, अनेक प्रकल्पांना गती





वृत्तसंस्था/नवी दिल्ली

राज्यातील विविध विकास प्रकल्पांच्या पाठपुराव्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेले दोन दिवस दिल्लीत अनेक नेत्यांच्या भेटी घेतल्या. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा, केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथसिंह, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान, केंद्रीय गृहनिर्माण मंत्री मनोहरलाल खट्टर तसेच नीती आयोगाशी या बैठका झाल्या.

अमित शाह आणि राजनाथसिंह यांची सदिच्छा भेट

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची संसद भवनात सदिच्छा भेट घेतली. महाराष्ट्राशी संबंधित विविध प्रकल्पांवर तसेच विषयांवर त्यांनी चर्चा केली. सुमारे २५ मिनिटे ही बैठक चालली. मुख्यमंत्र्यांनी संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांचीही सदिच्छा भेट घेतली आणि विविध विषयांवर त्यांच्याशी चर्चा केली. केंद्रीय गृहनिर्माण मंत्री मनोहरलाल खट्टर आणि हरयाणाचे मुख्यमंत्री नायबसिंग सैनी यांचीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीत सदिच्छा भेट घेतली.

निर्मला सीतारामन यांची भेट

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची भेट घेतली आणि त्यात जागतिक वित्तीय संस्थांकडून विविध प्रकल्पांसाठी केंद्रीय आर्थिक व्यवहार मंत्रालयाकडून परवानगी देण्याची मागणी केली. महाराष्ट्राने आपली अर्थव्यवस्था सर्व निकषांवर उत्तम राखल्याबद्दल निर्मला सीतारामन यांनी यावेळी प्रशंसा केली.

या प्रकल्पांमध्ये १००० लोकसंख्या असलेल्या गावांना काँक्रिट रस्त्यांनी जोडण्यासाठीचा प्रकल्प आहे. यासाठी आशियाई डेव्हलपमेंट बँकेकडून १ अब्ज डॉलर्स (सुमारे ८६५१ कोटी रुपये) इतके आर्थिक सहाय्य मागण्यात आले आहे. दुसरा प्रकल्प महाराष्ट्रातील समुद्रकिनाऱ्याची पातळी वाढत असल्याने त्याचे नैसर्गिक उपायांनी निराकरण करणे हा आहे. यासाठी ५०० मिलियन डॉलर्स (सुमारे ४३२६ कोटी रुपये) इतकी मदत मागण्यात आली आहे. तिसरा प्रकल्प महापालिका शहरांमधून सांडपाण्यावर प्रक्रिया करुन उद्योगांसाठी पुनर्वापर हा आहे. यासाठी ५०० मिलियन डॉलर्सचे (सुमारे ४३२६ कोटी रुपये) अर्थसहाय्य मागण्यात आले आहे.

उर्वरित दोन प्रकल्पांसाठी जागतिक बँकेकडून मदत मागण्यात आली आहे. या तिन्ही प्रकल्पांसाठी वित्तमंत्रालयाने मंजुरी द्यावी, यासाठीचे निर्देश निर्मला सीतारामन यांनी या बैठकीत दिले. या बैठकीला वित्त विभाग सचिव अनुराधा ठाकूर, मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी आणि मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे उपस्थित होत्या.

विदर्भात खताचा प्रकल्प, जे. पी. नड्डा यांच्याशी भेट

केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांच्या भेटीत विदर्भात एक खतांचा मोठा प्रकल्प उभारण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चर्चा केली. नागपूर जिल्ह्यात गेल, फर्टिलायझर विभाग आणि महाराष्ट्र सरकारच्या संयुक्त उपक्रमातून हा १२.७ लाख टनाचा प्रकल्प असणार आहे. सुमारे १०,००० कोटींचा हा प्रकल्प असणार आहे. या प्रकल्पासाठी सबसिडी देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

यासंदर्भातील मंत्रिमंडळ प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना जे. पी. नड्डा यांनी दिल्या. फर्टिलायझर विभागाचे सचिव रजतकुमार मिश्रा यावेळी उपस्थित होते.

१४,००० कि.मी.चे ग्रामीण रस्ते, शिवराजसिंह यांच्याशी भेट

महाराष्ट्रात १४,००० कि.मी.चे रस्ते तयार करण्यासाठीचा एक प्रस्ताव महाराष्ट्राने केंद्रीय ग्रामविकास मंत्रालयाकडे दिला आहे. हा एकूण प्रस्ताव २.६ बिलियन डॉलर्सचा (सुमारे २२,४९० कोटी रुपये) असून, यातच एडीबीचे सहाय्य घेण्यात येणार आहे.

२५ वर्ष मेंटेनन्स फ्री या तत्त्वावर हे रस्ते उभारण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांसाठी हा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प ठरेल, यातून त्यांना चांगली कनेक्टिव्हीटी मिळेल, असे शिवराजसिंह चौहान यांनी सांगितले. या प्रकल्पाला मदत करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केली. महाराष्ट्रात प्रधानमंत्री आवास योजनेत सर्वेक्षणाचे काम अतिशय गतीने केल्याबद्दल शिवराजसिंह चौहान यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले. महाराष्ट्रात देशात सर्वाधिक ३० लाख घरे केंद्र सरकारने मंजूर केली आहेत, हे याठिकाणी उल्लेखनीय.

नीती आयोगाची बैठक

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बीव्हीआर सुब्रमण्यम आणि सदस्य राजीव गौबा यांची भेट घेतली. एफआरबीएम मर्यादा २५ टक्के असताना महाराष्ट्राने १८ टक्के इतकी ती राखल्याबद्दल नीती आयोगाने प्रशंसा केली. एनसीडी (नॉन कम्युनिकेबल डिसिज) स्क्रिनींगसाठी आर्टिफिशियल इंटिलिजन्सचा वापर, बांबू आधारित क्लस्टर (हे दोन्ही प्रकल्प प्रत्येकी ५०० मिलियन अमेरिकन डॉलर्सचे), मराठवाडा वॉटर ग्रीड आणि दमणगंगा-गोदावरी नदीजोड प्रकल्पासह अन्य जलसंधारण प्रकल्प (सुमारे १ अब्ज अमेरिकन डॉलर्स) तसेच महाराष्ट्रातील आयटीआयला खासगी उद्योगांशी जोडून कौशल्य प्रशिक्षणाचा कार्यक्रम इत्यादी प्रकल्पांबाबत सविस्तर चर्चा झाली आणि त्याचे सादरीकरण झाले. या प्रकल्पांच्या परवानग्यांना गती देण्यात येईल, असे आश्वासन निती आयोगाने दिले.

विदर्भ ज्ञान संस्थेला स्वायत्त विद्यापीठ दर्जासाठी सहकार्य करणार : उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील





वृत्तसंस्था/अमरावती

शहराच्या हृदयस्थानी १६७ एकरावर आणि साडेतीनशे विविध वनस्पती असलेल्या शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेला स्वायत्त विद्यापीठाचा दर्जा मिळवण्यासाठी सहकार्य करू असे आश्वासन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले.

आज शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेत परीक्षा भवन व प्रशासकीय इमारत, उपहारगृह, विद्यार्थी सामान्य सुविधा कक्ष, सामायिक परीक्षा कक्ष, वाचनालयाचे उद्घाटन, तसेच स्मार्ट क्लासरूमचे भूमिपूजन करण्यात आले. यानिमित्ताने आयोजित मुख्य कार्यक्रमात उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेचे संचालक डॉ. सतीश माळोदे आदी उपस्थित होते.

मंत्री श्री. पाटील म्हणाले, महाविद्यालयाला स्वायत्ततेचा दर्जा दिल्याने अनेक विकास कामे चांगल्या पद्धतीने झाली. पालकमंत्री असताना शासन आणि जिल्हा नियोजनमधून दिलेल्या निधीचा चांगला उपयोग झालेला आहे. या निधीमधून देखण्या इमारती उभ्या राहिलेल्या आहेत. त्यामुळे येत्या काळात महाविद्यालयाने स्वायत्त विद्यापीठ होण्यासाठी प्रयत्न करावे. यामध्ये सरकार म्हणून कोणताही अडथळा येणार नाही. स्वायत्त विद्यापीठ होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या प्रक्रिया करावी. तसेच कागदपत्र तयार ठेवावे. काही विद्यापीठांना संलग्न करून विद्यार्थी केंद्रबिंदू मानून कार्य करावे. स्वायत्त विद्यापीठ झाल्यास विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे अभ्यासक्रमही स्वतंत्रपणे राबविता येतील.

शैक्षणिक विकासासाठी शासन कटिबद्ध आहे. राज्यात वारणा, रयत, होमी भाभा यांना स्वायत्त विद्यापीठाचा दर्जा दिलेला आहे. त्यासोबतच येत्या काळात साडेपाचशे प्राध्यापक आणि सुमारे ३००० अशैक्षणिक कार्य करणाऱ्यांची भरती होणार आहे. विद्यार्थ्यांहित लक्षात घेऊन शासनाने नवीन शैक्षणिक धोरण आणले आहे. या शैक्षणिक धोरणातून माणूस केंद्रित धोरण ठेवले आहे. देशाबद्दल प्रेम असणारा एक नागरिक घडवण्यासाठी यातून प्रयत्न केले जाणार आहे. एक चांगला माणूस व्हावा आणि त्याने अर्थार्जन करावे, यासाठी नवीन शैक्षणिक पद्धती उपयुक्त ठरणार आहे. पारंपरिक शिक्षणासोबतच युवक योग, प्राणायाम, चित्रकला अशा विविध अंगांनी हे शिक्षण उपयुक्त ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत वारसाला नोकरी देण्यासाठी कार्यपद्धती तयार करा : उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम



वृत्तसंस्था/मुंबई

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अंतर्गत, अत्याचार प्रकरणांमध्ये मृत व्यक्तीच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय सेवेत वर्ग ३ आणि वर्ग ४ च्या पदावर प्राधान्याने नियुक्ती देण्याबाबतची कार्यपद्धती सामाजिक न्याय विभागाने तयार करावी, असे निर्देश अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी दिले.

उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत मृत व्यक्तीच्या कुटुंबातील सदस्याच्या वारसाला नोकरी देण्याबाबत आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस सामाजिक न्याय विभागाचे उपसचिव रवींद्र गोरवे, मुंबई विभागाचे प्रादेशिक उपायुक्त बाळासाहेब सोळंकी, पुणे विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे, अवर सचिव सतीश खैरमोडे, विभागातील संगीता शिंदे, किशोर बडगुजर, गणेश भदाने, संजय कोठे, शिवानंद भिनगीरे यांच्यासह सामाजिक न्याय विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

उपाध्यक्ष श्री. मेश्राम म्हणाले, या प्रक्रियेसाठी प्रादेशिक उपआयुक्त कार्यालयाने जिल्हानिहाय वर्ग ३ आणि वर्ग ४ मधील रिक्त पदांची यादी सर्व प्रादेशिक उपायुक्तांनी संकलित करून ती समाज कल्याण आयुक्तालयाकडे १५ दिवसात सादर करावी. काही जिल्ह्यात वारसांना नोकरी देण्यात आली आहे ती कोणत्या आधारावर दिली आहे त्याप्रमाणे इतर जिल्ह्यात याबाबत का कार्यवाही करण्यात आली नाही याबाबतचा अहवाल मागवावा. सर्व जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत बैठक घेण्यात यावी. इतर राज्यामध्ये या कायद्याची अंमलबजावणी कशी करण्यात आली किंवा नेमके काय दिशानिर्देश आहेत त्याची तुलनात्मक व अभ्यासपूर्ण माहिती घ्यावी व ती पुढील बैठकीत सादर करावी, तसेच पुढील बैठकीस संपूर्ण तपशीलवार माहिती, अहवाल अभिप्रायासह महिनाभरात घेण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

राज्यपालांची राजभवन येथील कर्करोग जनजागृती शिबिराला भेट

वृत्तसंस्था/मुंबई

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राजभवन येथे अधिकारी, कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी आयोजित कर्करोग जनजागृती शिबिराला भेट देऊन तपासणी आणि जनजागृती उपक्रमाची माहिती घेतली.

महिलांनी व मुलींनी कर्करोगासंदर्भातील पूर्व चाचणी नियमितपणे करून घ्यावी. तसेच, कर्करोगाविषयी जनजागृतीसाठी अशा शिबिरांचे आयोजन सातत्याने करण्यात यावे. पूर्व तपासणीतून रोग लवकर लक्षात आल्यास वेळेवर निदान व उपचार शक्य होतात. त्यामुळे अधिकाधिक लोकांनी अशा शिबिरांमध्ये सहभागी होऊन चाचणी करून घ्यावी, असे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले.



राजभवन, मुंबई डिस्पेंसरी आणि कॅन्सर पेशंट्स एड असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने कर्करोग जनजागृती शिबिर व व्याख्यानाचे आयोजन राजभवन क्लब येथे करण्यात आले.

कर्करोग पूर्व निदानासाठी मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरातही ९ ते ४५ वयोगटातील मुली आणि महिलांसाठी गर्भाशयाच्या कर्करोग प्रतिबंधक लसीकरणाची व्यवस्था करण्यात आली. पॅप स्मिअर, व्हीव्ही टेस्ट, ब्रेस्ट तपासणी आणि प्रोस्टेट (व्हीव्ही) टेस्ट यांचा समावेश होता. एकूण ११० व्यक्तिंना ह्यूमन पॅपिलोमाव्हायरस (एचपीव्ही) प्रतिबंधक लस देण्यात आली. तपासणी शिबीराचा १७१ कर्मचाऱ्यांनी लाभ घेतला.

यावेळी आरोग्य तपासणी कार्यक्रमात कॅन्सर पेशंट एड असोसिएशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. अलका सप्रू बिसेन; कॅन्सर स्क्रिनिंग सेवा विभागाच्या कार्यकारी संचालिका सौ. नीता मोरे ; स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. तृप्ती पोयरेकर; तसेच जनरल सर्जन डॉ. सत्येंद्र मेहरा यांनी त्यांच्या तज्ज्ञ टीम व कॅन्सर पेशंट्स एड असोसिएशनचे पदाधिकारी व राजभवन दवाखान्यातील डॉक्टर, कर्मचारी, उपस्थित होते.

विदर्भ ज्ञान संस्थेला स्वायत्त विद्यापीठ दर्जासाठी सहकार्य करणार : उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील

वृत्तसंस्था/अमरावती

शहराच्या हृदयस्थानी १६७ एकरावर आणि साडेतीनशे विविध वनस्पती असलेल्या शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेला स्वायत्त विद्यापीठाचा दर्जा मिळवण्यासाठी सहकार्य करू असे आश्वासन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी दिले.



आज शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेत परीक्षा भवन व प्रशासकीय इमारत, उपहारगृह, विद्यार्थी सामान्य सुविधा कक्ष, सामायिक परीक्षा कक्ष, वाचनालयाचे उद्घाटन, तसेच स्मार्ट क्लासरूमचे भूमिपूजन करण्यात आले. यानिमित्ताने आयोजित मुख्य कार्यक्रमात उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेचे संचालक डॉ. सतीश माळोदे आदी उपस्थित होते.

मंत्री श्री. पाटील म्हणाले, महाविद्यालयाला स्वायत्ततेचा दर्जा दिल्याने अनेक विकास कामे चांगल्या पद्धतीने झाली. पालकमंत्री असताना शासन आणि जिल्हा नियोजनमधून दिलेल्या निधीचा चांगला उपयोग झालेला आहे. या निधीमधून देखण्या इमारती उभ्या राहिलेल्या आहेत. त्यामुळे येत्या काळात महाविद्यालयाने स्वायत्त विद्यापीठ होण्यासाठी प्रयत्न करावे. यामध्ये सरकार म्हणून कोणताही अडथळा येणार नाही. स्वायत्त विद्यापीठ होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या प्रक्रिया करावी. तसेच कागदपत्र तयार ठेवावे. काही विद्यापीठांना संलग्न करून विद्यार्थी केंद्रबिंदू मानून कार्य करावे. स्वायत्त विद्यापीठ झाल्यास विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे अभ्यासक्रमही स्वतंत्रपणे राबविता येतील.

शैक्षणिक विकासासाठी शासन कटिबद्ध आहे. राज्यात वारणा, रयत, होमी भाभा यांना स्वायत्त विद्यापीठाचा दर्जा दिलेला आहे. त्यासोबतच येत्या काळात साडेपाचशे प्राध्यापक आणि सुमारे ३००० अशैक्षणिक कार्य करणाऱ्यांची भरती होणार आहे. विद्यार्थ्यांहित लक्षात घेऊन शासनाने नवीन शैक्षणिक धोरण आणले आहे. या शैक्षणिक धोरणातून माणूस केंद्रित धोरण ठेवले आहे. देशाबद्दल प्रेम असणारा एक नागरिक घडवण्यासाठी यातून प्रयत्न केले जाणार आहे. एक चांगला माणूस व्हावा आणि त्याने अर्थार्जन करावे, यासाठी नवीन शैक्षणिक पद्धती उपयुक्त ठरणार आहे. पारंपरिक शिक्षणासोबतच युवक योग, प्राणायाम, चित्रकला अशा विविध अंगांनी हे शिक्षण उपयुक्त ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील धोकादायक शाळा इमारतींचे सर्वेक्षण करावे : शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

वृत्तसंस्था/मुंबई

विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि सुरक्षितता या बाबी महत्त्वाच्या असल्याने राज्यातील धोकादायक शाळा इमारतींचे सर्वेक्षण करून शाळांमध्ये आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्यास प्राधान्य द्यावे, अशा सूचना शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिल्या.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षतेच्या अनुषंगाने राज्यातील शाळा इमारत सुरक्षितेसाठी राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी तातडीने बैठक घेतली. मंत्रालयात झालेल्या या बैठकीस प्रधान सचिव रणजितसिंह देओल, उपसचिव समीर सावंत आदी उपस्थित होते. तर दूरदृश्य प्रणालीद्वारे शालेय शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, समग्रचे प्रकल्प संचालक संजय यादव, प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी आणि राज्यातील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व शिक्षणाधिकारी सहभागी झाले होते.



राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी सांगितले, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिक क्षेत्रातील शाळा इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिटही करावे. याबाबतचा अहवाल जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर करावा.

जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रातील मोडकळीस आलेल्या शाळा इमारतींची तपासणी करून त्यांची बांधकामे नव्याने करण्यासाठी सर्व्हे करून सर्व समावेशक आराखडा तयार करावा. तसेच धोकादायक शाळा इमारतींच्या बांधकामासाठी प्राधान्यक्रम ठरवून जिल्हा नियोजन समितीमधून आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी सांगितले.

संपादकीय...

ना कट केला, ना स्फोट घडवले!

या आणि अशा हल्ल्यांत पाकिस्तानचा हात असेलच असेल. पण तो सिद्ध करण्यास चोख पुरावा हवा, सामाजिक, राजकीय त्रागा हा पुराव्यास पर्याय असू शकत नाही. मुंबईतील '७/११' च्या बॉम्बहल्ल्यात आप्तेष्ट गमावलेल्यांस उच्च न्यायालयाचा निर्णय अन्यायकारक वाटू शकेल; पण पोलिसी तपासातील ढिसाळपणा अधिक धक्कादायक ठरतो. सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) राजकीयीकरणाबाबत सर्वोच्च न्यायालय तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त करत असताना इकडे मुंबईत उच्च न्यायालयाने २००६ सालच्या जुलै महिन्यात मुंबईत झालेल्या साखळी बॉम्बस्फोटांतील सर्व आरोपींना निर्दोष सोडावे यात अर्थाअर्थी काही संबंध नाही; असे काहींस वाटेल. पण तसे नाही. हा संबंध आहे. या दोन्ही प्रकरणांत उच्च आणि सर्वोच्च न्यायालय चौकशी यंत्रणांच्या प्रामाणिकपणाविषयी प्रश्न उपस्थित करते. सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश भूषण गवई यांनी सक्तवसुली संचालनालयाच्या अलीकडील कार्यपद्धतीचे वाभाडे सोमवारी काढले. त्याच वेळी मुंबई उच्च न्यायालयात '७/११' च्या साखळी बॉम्बस्फोटांतील सर्व आरोपींना 'बाइज्जत' निर्दोष सोडण्याचा निर्णय देताना न्यायाधीशांनी जे भाष्य केले त्यातून मुंबई पोलिसांची अब्रू पार धुळीस मिळते. या निकालाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आणि त्याची प्रक्रिया सुरूही झाली. उद्या, गुरुवारी २४ जुलैस त्यावर प्राथमिक सुनावणी सुरू होईल. हे योग्यच. पण या प्रकरणातील सर्व आरोपींना तुरुंगातून लगेच मुक्तही करण्यात आले आहे, याकडे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी लक्ष वेधले. ही बाब महत्त्वाची. कारण सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी उच्च न्यायालय निर्णयाच्या विपरीत निर्णय दिला तर हे सर्व प्रकरण नव्याने न्यायालयात चालवावे लागेल. शिवाय यात काही घटनात्मक (कॉन्स्टिट्यूशनल) मुद्दा नाही. तो गुन्हेगारी (क्रिमिनल) आहे. त्याच्या निकालास राज्य सरकारने दिलेले आव्हान आणि या आरोपींची न्यायालयातून झालेली मुक्तता हे लक्षात घेतल्यास सर्वोच्च न्यायालय यात किती आणि काय करणार, हे कळेलच. तूर्त उच्च न्यायालयाच्या निकालाविषयी. हा निकाल जितका कथित दहशतवाद्यांविरोधात होता / आहे त्यापेक्षा कित्येक पट अधिक तो मुंबई पोलिसांच्या या प्रकरणाच्या आळशी आणि अयोग्य हाताळणीबाबत आहे. या साखळी बॉम्बस्फोटांनी मुंबई हादरली होती. जवळपास २०० जणांनी हकनाक जीव त्यात गमावले. हे बॉम्बस्फोट मुंबईची जीवनदायिनी असणाऱ्या लोकल गाड्यांत झाले. त्यामुळे अनेकांच्या मनात या प्रवासाची कायमची भीती बसली. शिवाय त्यातून १९९३ च्या बॉम्बस्फोट मालिकेच्या आठवणी जाग्या झाल्याने एक वेगळीच अस्थिरता निर्माण झाली. अशा परिस्थितीत या स्फोटाचा तपास मुंबई पोलिसांनी अधिक जबाबदारीने करणे आवश्यक होते. मुंबई उच्च न्यायालयाच्या या निकालातील तपशील पाहता मुंबई पोलिसांनी ही जबाबदारी चोख पार पाडली असे म्हणता येणार नाही. या स्फोटांचा तपास पूर्ण होऊन विशेष न्यायालयात आरोप दाखल होईपर्यंत नऊ वर्षे उलटली. या विशेष न्यायालयाने या प्रकरणातील १३ पैकी १२ आरोपींस दोषी ठरवले होते. पाकिस्तान-स्थित 'लष्कर-ए-तैयब्बा' या दहशतवादी संघटनेशी संबंध, 'आयएसआय' या पाकिस्तानच्या गुप्तहेर यंत्रणेकडून हाताळणी, 'स्टुडेंट्स इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया' ऊर्फ 'सिमी' या बंदी घातलेल्या दहशतवादी संघटनेच्या सदस्यांचा सक्रिय सहभाग इत्यादी आरोप या सर्वांवर ठेवले गेले. ते सर्वच्या सर्व मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळले. या हल्ल्यांची भीषणता, सुमारे २०० जणांचा गेलेला जीव, हजारांहून अधिकांचे जायबंदी होणे इत्यादी पाहिल्यास आरोपींस निर्दोष सोडण्याचा मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय सर्वसामान्यांस खळबळजनक आणि या हल्ल्यांत आपले आप्तेष्ट गमावलेल्यांस अन्यायकारक वाटू शकेल; हे खरे. पण या निकालाचे सविस्तर वाचन केल्यास या भीषण हल्ल्यांची चौकशी करणाऱ्या पोलिसांचा ढिसाळपणा अधिक धक्कादायक ठरेल. त्याचे अनेक नमुने या निकालात न्यायाधीशांनी सविस्तरपणे दिले आहेत. या प्रकरणात तत्कालीन पोलीस उपायुक्त ब्रिजेश सिंग आणि दुसरे उपायुक्त डी. एम. फडतरे यांचे जबाब नोंदले गेले. ही जबाब नोंदणी स्वतंत्रपणे, दोन वेगवेगळ्या दिवशी झाली. तथापि या दोघांस विचारण्यात आलेले प्रश्न, त्यांचा क्रम आणि त्याहीपेक्षा मुख्य म्हणजे त्या दोघांनी दिलेली उत्तरे यांतील शब्द न शब्द सारखा कसा, असा प्रश्न न्यायालय विचारते. 'एक वेळ प्रश्नांचा क्रम सारखा होता, याकडे दुर्लक्ष करता येईल. पण उत्तरे एकमेकांची छायाप्रत वाटावी, इतकी समान कशी', हा न्यायालयाचा प्रश्न चौकशीतील कथित बनाव नजरेस आणतो. यातील आरोपींनी स्वतःच्या हस्ताक्षरात गुन्ह्यात हात असल्याची कबुली दिली. पण ती देण्याआधी सरकारी डॉक्टरांनी केलेल्या तपासणीत या आरोपींचा अनन्वित छळ झाल्याची नोंद आहे. म्हणजे ही कथित कबुली पोलिसांच्या जाचातून सुटका करून घेण्यासाठी दिली गेली, याकडे न्यायालय लक्ष वेधते. त्याआधी पोलीस सातत्याने आरोपी तपासात सहकार्य करत नसल्याची तक्रार करत होते. त्यानंतर या आरोपींस संघटित गुन्हेगारीविरोधातील कडक 'महाराष्ट्र कंट्रोल ऑफ ऑर्गनाईज्ड क्राइम ॲक्ट' (मकोका) लावला गेला आणि त्यानंतर लगेचच या आरोपींनी गुन्ह्यांची कबुली दिली, हे कसे? 'मकोका'तर्गत जबाब नोंदवून घ्यावयाचा असेल तर तो किमान पोलीस उपायुक्त वा त्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या साक्षीने नोंदवावा लागतो. येथे तसे झाले नाही. तसेच या आरोपींवर विविध कलमे लावताना पोलिसांची एकसारखी भाषा उथळ चौकशीची साक्ष देते, असे न्यायालयास वाटते. या प्रकरणी पोलिसांनी आठ साक्षीदार सादर केले. त्यातील एक टॅक्सीचालक होता. त्याच्या वाहनातून आरोपींनी गुन्ह्यानंतर पलायन केले, असे पोलिसांचे म्हणणे. पण हा टॅक्सीचालक साक्ष देण्यास एकदम १०० दिवसांनी कसा काय उगवला आणि जवळपास तीन महिन्यांनी त्याला आपल्या प्रवाशांचा चेहरा आठवत होता, हे कसे? यात 'बॉम्ब बनवताना' पाहिलेले आणि कटाची योजना आखताना त्यांना 'ऐकलेले' साक्षीदारही पोलिसांनी सादर केले. पण उलट तपासणीत ते आपली साक्ष अजिबात सिद्ध करू शकले नाहीत. जो साक्षीदार पोलिसांसमोर ठामपणे काही विधाने करत होता तोच साक्षीदार न्यायालयात मात्र 'मला वाटते', 'संशय आहे', 'खात्री नाही' असे सांगू लागला. कटकारस्थान ऐकल्याचा दावा करणारा तर 'मी आरोपींना काही पुटपुटताना पाहिले... ते काय बोलत होते हे कळले नाही' असे म्हणाला. खेरीज या स्फोटात वापरलेले 'आरडीएक्स' आले कोठून, आणले कोणी, उरलेले कोठे गेले, त्याची वाहतूक कशी झाली इत्यादी तपशील पोलीस अजिबात सिद्ध करू शकले नाहीत, असे निकालपत्रात नमूद आहे. तपासात हे असे का झाले असावे? या प्रश्नाचे उत्तर 'राजकीय दबाव' हे असू शकते. दहशतवादी कृत्य घडलेले आहे म्हणजे त्यात पाकिस्तानचा हात असायलाच हवा हे गृहीतक आणि ते सिद्ध करण्यासाठी काही मुसलमान सादर करणे हा दहशतवादामुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक प्रक्षोभावरील ठरलेला उतारा. तोच या प्रकरणी सादर झाला किंवा काय, हा प्रश्न. न्यायालयाच्या निकालावरून तो निर्माण होतो. या आणि अशा हल्ल्यांत पाकिस्तानचा हात असेलच असेल. पण तो सिद्ध करण्यास चोख पुरावा हवा. सामाजिक, राजकीय त्रागा हा पुराव्यास पर्याय असू शकत नाही. मग मुद्दा पहलगामचा असो वा '७/११' च्या हल्ल्याचा. न्यायालयात सत्य हा बचाव नसतो. ते सत्य सिद्ध करण्यास पुरावा लागतो. तो या प्रकरणी नाही, असे उच्च न्यायालय म्हणते. हे आपल्या चौकशी यंत्रणा आणि न्यायिक प्रक्रियेचे अपयश. ना जवळपास दोन दशकांनंतरही 'ना कोणी कट केला, ना कोणी स्फोट घडवले', किंवा 'ना कोणी कोणास मारले; ना कोणी मेले', असे म्हणावे लागत असेल आणि त्यावरून 'ना कोई आया, ना गया' आदी अन्य 'ना'कारांचे स्मरण होत असेल तर तो व्यवस्थेचा नाकर्तेपणा ठरतो.

पाकिस्तानी ऑपरेशन बद्रः युद्धास कारण!

(२६ जुलैः भारतीय कारगिल विजय दिवस)



कारगिल युद्ध आधुनिक इतिहासातील अतिउंचीवरच्या युद्धाचे अत्युत्?कृष्ट उदाहरण आहे. यात युद्धाला लागणारी सामग्री व मनुष्यबळ ने-आण करण्याचा चांगलाच अनुभव भारतीय सैन्याला मिळाला. हे युद्ध दोन्ही देश अण्वस्त्रसज्ज झाल्यानंतरचे पहिलेच युद्ध होते. त्यामुळे सर्व जगाचे लक्ष या युद्धाकडे लागले होते. परंतु भारताने हे युद्ध कारगिलपुरतेच मर्यादित ठेवले. शेवटी २६ जुलै रोजी कारगिल युद्ध भारताने जिंकले. सदर माहितीपूर्ण रोचक लेख श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी प्रस्तुत करताहेत... संपादक.



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी. एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

कारगिल युद्धातील वीरांच्या स्मरणार्थ दरवर्षी २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस साजरा केला जातो. हा दिवस संपूर्ण भारतात आणि राष्ट्रीय राजधानी नवी दिल्ली येथे साजरा केला जातो, जिथे भारताचे पंतप्रधान दरवर्षी इंडिया गेटवर अमर जवान ज्योती येथे सैनिकांना श्रद्धांजली अर्पण करतात. भारतीय सशस्त्र दलांच्या योगदानाच्या स्मरणार्थ देशभरात कार्यक्रमही आयोजित केले जातात. इ.स.१९९८-९९च्या हिवाळ्यात पाकिस्तानी लष्करातून अनेक तुकड्यांना मुजाहिदीनच्या वेषात भारतात नियंत्रण रेषेपलीकडे पाठवण्यात आले. या कारवाईला ऑपरेशन बद्र असे नाव देण्यात आले. कुणाच्याही लक्षात न येता त्यांनी रिकाम्या भारतीय चौक्यांचा ताबा घेतला. हिवाळ्यात प्रचंड थंडीमुळे सैन्य माघारी घेतले गेले. नियंत्रण रेषेच्या जास्तीत जास्त आत घुसखोरी करून राष्ट्रीय महामार्ग १च्या जवळ यायचे. असे केले, की महामार्गावर कायमस्वरूपी ताबा मिळवता येईल. नंतर राजकीय वजन वापरून काश्मीरच्या प्रश्नाचे आंतरराष्ट्रीयीकरण करणे पाकिस्तानला सोपे पडेल, असा हा या कारवाईचा मुख्य उद्देश होता. भारताला नवीन नियंत्रणरेषा मान्य करायला भाग पाडले, की लडाख व सियाचीनला भारतापासून तोडणे सोपे जाईल, असा पाकिस्तानी युद्धनीतिज्ञांचा कयास होता. तसेच घुसखोरीदरम्यान कारगील- काश्मीर परिसरात अंतर्गत बंडखोरी भडकावून भारताला अजून बुचकळ्यात पाडण्याचा पाकिस्तानी व्यूह होता. भारतीयांनी सियाचीन हिमनदीवर नियंत्रण मिळवण्यात जी क?लृप्ती वापरली. तसाच काहीसा प्रकार पाकिस्तानने केला, असा काही लेखकांचा सूर होता.

कारगिल युद्ध हे भारत व पाकिस्तान यांच्या दरम्यान सन १९९९च्या उन्हाळ्यात लढले गेलेले मर्यादित युद्ध होते. या युद्धाची व्याप्ती भारताच्या कारगिल व आजूबाजूच्या परिसरापुरतीच मर्यादित राहिली, त्यामुळे याला मर्यादित युद्ध म्हणतात. तसेच या पूर्वीच्या भारत-पाक युद्धांप्रमाणेच याही युद्धात, युद्ध सुरू झाल्याची व संपल्याची कोणतीही घोषणा करण्यात आलेली नव्हती. उलट पाकिस्तानतर्फे युद्धादरम्यान त्यांचा देश अलिप्त आहे, असा कांगावा करण्यात आला होता. पुढे अनेक वर्षांनंतर हळुहळू पाकिस्तान सरकारने व अनेक लष्करी अधिकाऱ्यांनी हे युद्धच होते, असे जाहीर केले. सन १९९९च्या उन्हाळ्यात पाकिस्तानी घुसखोरांनी भारतीय सीमा ओलांडून भारताच्या हद्दीतील अनेक ठाणी कब्जात घेतल्याचे भारताच्या लक्षात आले. या घुसखोरांना हुसकावण्यासाठी कारगिलचे युद्ध सुरू झाले. ही ठाणी कारगिल व द्रास परिसरातील अतिउंच दुर्गम जागी होती. अनेक महिन्यांच्या प्रयत?नांनंतर भारताला ही ठाणी परत मिळवण्यात यश मिळाले. कारगिल हे शहर जम्मू आणि काश्मीरची राजधानी श्रीनगरपासून २०५ किमी अंतरावर भारत-पाक आंतरराष्ट्रीय नियंत्रण रेषेपासून जवळ आहे. हिमालयाच्या इतर भागाप्रमाणे कारगिलमध्येही थंड वातावरण असते. उन्हाळा हा सौम्य तर हिवाळा अतिशय दीर्घ व कडक असतो. बऱ्याचदा तापमान -४० अंशापर्यंतही उतरू शकते. राष्ट्रीय महामार्ग लेह ते श्रीनगर या रस्त्यावर कारगिल वसलेले आहे. कारगिलचे युद्ध होण्याचे प्रमुख कारण हा रस्ता हे होय. घुसखोरांनी पाकव्याप्त काश्मीरच्या जवळच्या आणि रस्त्याला समांतर अशा १६० किलोमीटरच्या पट्ट्यातच साधारणपणे घुसखोरी केली. लष्कराच्या अनेक चौक्या या भागात आहेत. त्यातील काही चौक्या समुद्रसपाटीपासून पाच हजार मीटरपेक्षाही अधिक उंचावर आहेत. नुसतेच कारगिल नव्हे तर आग्नेयेकडील द्रास व नैर्ऋत्येकडील मश्को खोऱ्यातील, तसेच बटालिक विभागातील चौक्यांवरही घुसखोरी झाली.

कारगिल शहर हे सामरिक दृष्ट्या महत्त्वाचे आहे. इ.स.१९७१च्या युद्धानंतर भारत व पाकिस्तानमध्ये थेट मोठे युद्ध झाले नाही. तरी सातत्याने छोट्या मोठ्या चकमकी होत आहेत. भारतीयांच्या सियाचीन हिमनदीवर तसेच सभोवतालच्या परिसरावर नियंत्रण मिळवण्यात दोन्ही बाजू सातत्याने प्रयत?नशील असतात. इ.स.१९८०च्या सुमारास पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी पंजाबात खलिस्तानच्या नावावर दंगा घातला. तसेच इ.स.१९९०च्या सुमारास काश्मीरमध्ये दहशतवादाने मूळ धरले. परिणामी भारताने काश्मीरमध्ये कायमस्वरूपी सैन्य तैनात केले. हे दहशतवादी सुरुवातीच्या काळात काश्मीरमधील असत व त्यांना प्रशिक्षित करून पाठवले जात असे. काही काळानंतर पाकिस्तानी सैनिक, अधिकारी व तालिबानी अफगाणिस्तानातील भाडोत्री अतिरेक्यांनाही काश्मीरमध्ये पाठवले जाऊ लागले. पाकिस्तानने नेहमीच या बाबतीत आपला सहभाग असल्याचा इन्कार केला. कारगिलच्या युद्धातदेखील पाकिस्तानने हीच खेळी वापरली व घुसखोर हे काश्मिरी स्वातंत्र्यसैनिक आहेत, असे जगाला सांगण्याचा प्रयत?न केला. इ.स.१९९८मध्ये भारत पाकिस्तानने अणुचाचण्या केल्यानंतर दोन्ही देशातील संबंध चांगलेच ताणले गेले. परंतु तत्कालीन पंतप्रधान मा.वाजपेयी साहेबांनी मैत्रीचा हात पुढे करून संबंध निवळण्याचा प्रयत?न केला. त्यासाठी ते स्वतः लाहोरला जाऊन आले होते.

द्रास व मश्को खोऱ्यातील चौक्या या अतिउंचीवर आहेत. अतिउंचावरील चौक्यांवर कडक हिवाळ्याच्या महिन्यांत सैन्य तैनात करून ठेवणे अतिशय अवघड असते. हिवाळ्यापूर्वी दोन्ही बाजूने सैन्याची माघार व्हावी, उन्हाळ्यात बर्फ वितळल्यावर व हवामान मानवी रहाण्यास स्थिर झाल्यानंतर ते ते सैन्य आपापल्या चौक्यांमध्ये परतावे, असा अलिखित समझौता भारत-पाकिस्तानमध्ये, कारगिल युद्धाच्या आधीपर्यंत होता. मात्र सन १९९९ साली भारतीय सैन्य भारतीय चौक्यांवर परतण्यापूर्वीच पाकिस्तानी घुसखोरांनी ऐन हिवाळ्यात चौक्यांचा ताबा घेतला. त्यामुळे कारगिलचे युद्ध भडकण्यास ठिणगी पडली. या चौक्यांचा ताबा घेतला गेल्याने राष्ट्रीय महामार्ग १ए- एनएच१ हा पाकिस्तानी तोफगोळ्यांच्या आणखी जवळच्या टप्प्यांत आला. तसेच उंचावरील चौक्यांचा ताबा घुसखोरांकडे गेल्याने त्यांना उतारावरील चौक्यावर नियंत्रण ठेवणे सोपे गेले. या चौक्या डोंगरमाथ्यावरील किल्ल्यांप्रमाणे होत्या. त्यांचा ताबा मिळवण्यास मोठ्या प्रमाणावर फौजेची गरज लागते. त्यातच अतिउंची व कडाक्याची थंडी हे काम अजूनच अवघड करते.

हे युद्ध आधुनिक इतिहासातील अतिउंचीवरच्या युद्धाचे अत्युत?कृष्ट उदाहरण आहे. यात युद्धाला लागणारी सामग्री व मनुष्यबळ ने-आण करण्याचा चांगलाच अनुभव भारतीय सैन्याला मिळाला. हे युद्ध दोन्ही देश अण्वस्त्रसज्ज झाल्यानंतरचे पहिलेच युद्ध होते. त्यामुळे सर्व जगाचे लक्ष या युद्धाकडे लागले होते. परंतु भारताने हे युद्ध कारगिलपुरतेच मर्यादित ठेवले. त्यामुळे दाखवलेल्या संयमाबद्दल भारताचे जगभर कौतुक झाले. म्हणूनच भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावर पाठिंबा मिळाला व याउलट, सैन्य मागे घ्यावे, यासाठी पाकिस्तानवर अमेरिकेसह अनेक देशांनी दबाव आणला. या युद्धानंतर भारताने आपल्या संरक्षण खर्चात अनेक पटीने वाढ केली. तर पाकिस्तानात राजकीय अस्थिरता माजली. परिणामी काही महिन्यांतच- ऑक्टोबर १९९९मध्ये पाकिस्तानात जनरल परवेझ मुशर्रफ यांनी नवाझ शरीफ यांचे सरकार उलथून लष्करशाही लागू केली. शेवटी २६ जुलै रोजी कारगिल युद्ध भारताने जिंकले.

!! कारगिल विजय दिनाच्या सर्व देशप्रेमी भारतीय बांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

कॅमेरा...

मोबाईल कॅमे-यांचे
सातत्ये असते लक्ष
सरसावले जागृकते
शोधते अचूक भक्ष्य

बिंग फोडाया भिंग
टिपायला राही दक्ष
कुणाचे चाले लफडे
सादर करतो समक्ष

चित्रीकरणवेळसाधे
सुसज्ज प्रत्येक पक्ष
खास एक्स्पर्ट नेमले
उघडला विशेष कक्ष

उघडे नागडे लफडे
करती कपाळ मोक्ष
अधीरहोतात बधीर
लावायले सोक्षमोक्ष

मिळते ब्रेकिंग न्यूज
कधीचं नाही दुर्भिक्ष
कुणांसकरु बदनाम
सजून बसे प्रतिपक्ष

कॅमे-यांपासूनसावध
रहावेजरासे चाणाक्ष
खुशाल करा लफडी
न्यूज पासून अपरोक्ष

जपून रहा रे बाबांनो
ते कॅमेरे देतील साक्ष
होत्याचे नव्हते होते
पडता तिरपा कटाक्ष

एकचंक्रॉप व्हिडिओ
करावा लागे पदमोक्ष
उध्वस्त करुन सगळे
कॅमेरा राही निर पेक्ष

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६.

अडचणी...

अलिकडे
नेत्यांच्या
का वाढते अडचणी
फुग्यात भरून हवा
कोण टोचते टाचणी

साधे सुधे वक्तव्यही
कशी होते रे बोचणी
शोधात असे विरोधी
उभे राहतात माचणी

शब्द शब्द महत्त्वाचा
करी केवढी जाचणी
पहा कोण अडकतो
सखोल हो तपासणी

सहनशील असेकिती
सततद्यायची चाचणी
मुद्दाम उचकवी कुणी
करत नित्य चाचपणी

जुने व्हिडिओ दाखवे
उघडे विवादझाकणी
आरोपआहेत चुकीचे
कुणीकरे पाठराखणी

गुन्हेगारां सोबतफोटो
प्रतिमाडागळे देखणी
काही खरमरीत लिहा
वळवळकरते लेखणी

सरळ रस्ता डाचतोयं
फक्तवाढव अडचणी
खोटेही वाटूलागे खरे
अशीचं करता रचणी

बडबड करतात बाळे
तोंडात कोंब चोखणी
बाजू पडली जन सेवा
समस्याजाय वळचणी

-- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६..

प्रभावी अंमलबजावणीसाठी रुग्णालयांची तपासणी करावी : ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे

वृत्तसंस्था /सातारा



धर्मादाय रुग्णालयांमध्ये त्यांच्या एकूण कार्यान्वीत खाटांपैकी १० टक्के निर्धन रुग्णांवर मोफत उपचार करण्यासाठी व १० टक्के खटा दुर्बल घटकांतील रुग्णांवर सवलतीच्या दराने उपचार करण्यासाठी राखून ठेवणे बंधनकारक आहे. याची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी धर्मादाय रुग्णालयांमध्ये जावून तपासणी करावी, असे निर्देश ग्रामविकस व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

धर्मादय रुग्णालय जिल्हास्तरीय समिती त्रैमासिक बैठक मंत्री श्री. गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयातील परिषद सभागृहात संपन्न झाली. या बैठकीला जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. विनाय काळे, अतिरिक्त जिल्हाधिकारी मिल्लाकर्जुन माने, सहायक धर्मादाय आयुक्त सरोजनी मांजेकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. युवराज करपे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. महेश खलीपे, डॉ. संदीप श्रोती, गेणश मेळावणे, डॉ. सुनिता पवार आदी उपस्थित होते.

निर्धन व दुर्बल संवर्गातील रुग्णांवर आवश्यक व दर्जेदार उपचार होण्यासाठी ही याजना अत्यंत महत्वपूर्ण आहे, असे सांगून मंत्री श्री. गोरे म्हणाले, धर्मादाय अंतर्गत नोंदी असलेल्या रुग्णालयांना शासन अनेक सवलती देते. त्यामुळे रुग्णांसाठी सदर निषांतर्गत आरक्षित खाटा त्यांना पारदर्शकपणे उपलब्ध करुन देण्याच्या योजनेची प्रभावी अंमबजावणी आवश्यक आहे. तसेच शासनास अपेक्षित असलेल्या निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांना लाभ होईल. त्यामुळे जिल्ह्यातील एकही रुग्ण सवलतींच्या खाटांपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

सातारा जिल्ह्यात धर्मादाय अंतर्गत १६ रुग्णालये कार्यरत आहेत. नाव्हेंबर २०२४ पासून आत्तापर्यंत १ हजार ७२१ रुग्णांना लाभ देण्यात आला आहे. जिल्ह्यात १५१ खाटा निर्धन तर १५१ खाटा दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी उपलब्ध आहेत. धर्मादाय रुग्णालयातील आरक्षित खाटा नियमानुसार निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांना उपलब्ध करून देणे, धर्मादाय रुग्णालयांमध्ये निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी आरक्षित असलेल्या रुग्णखाटांची, आरक्षित रुग्णखाटांपैकी उपलब्ध व रिक्त खाटांची तसेच कोणत्या रुग्णालयात कोणत्या आजारावरील उपचाराची सुविधा उपलब्ध आहे याची माहिती नागरिकांपर्यंत पोहचवावी. यामुळे गरजु रुग्णांना याचा लाभ घेता येईल व योजनेचा उद्देश पूर्ण होईल, असेही मंत्री श्री. गोरे यांनी बैठकीत सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी श्री. पाटील म्हणाले, धर्मादाय रुग्णालय असल्याबाबतचा फलक प्रत्येक रुग्णालयाच्या दर्शनी भागात लावला पाहिजे याची दक्षता घ्या. या रुग्णालयांमध्ये अनेकदा खाट शिल्लक नसल्याचे सांगितले जाते, ही गंभीर बाब असून हे टाळण्यासाठी धर्मादाय रुग्णलयाचे या विषयाबाबतचे कामकाज ऑनलाईनच झाले पाहिजे. शासनाच्या डॅशबोर्डवर किती रुग्णांवर उपचार केले, किती खाटा शिल्लक आहेत याची रोजच्या रोज माहिती भरली गेली पाहिजे. धर्मादाय रुग्णालयांमध्ये निर्धन व दुर्बल घटकासाठी असणाऱ्या खाटा, उपचार सवलत यांची माहिती व्हावी यासाठी शासनाने डिजीटल प्लॅटफॉर्म उपलब्ध दिला आहे. र्म्पूब्स्र्म्त्पज्ञे स्र्ष्ट्रू.दन.ग्ह या संकेतस्थळावर त्याची माहिती उपलब्ध होते. हा सर्व कारभार पारदर्शीपणे चालवण्यासाठी या अंतर्गत होणारे काम हे ऑनलाईन असले पाहिजे. सहायक धर्मदाय आयुक्त कार्यालयाबरोबर जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांनीही धर्मादाय रुग्णालयांची वेळोवेळी तपासणी करावी, अशाही सूचना जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी केल्या.

मत्स्यखाद्य खरेदीसंदर्भात नवीन मार्गदर्शक सूचना लागू : मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे

वृत्तसंस्था/मुंबई



मत्स्यखाद्य खरेदीसंदर्भात नवीन सूचनांमुळे राज्यातील मत्स्य प्रकल्प अधिक कार्यक्षम होतील तसेच स्थानिक उत्पादकांनाही चालना मिळेल. गुणवत्तापूर्ण व सुरक्षित मत्स्यखाद्यामुळे उत्पादनात वाढ होऊन राज्यातील मत्स्यव्यवसाय अधिक सक्षम व स्वावलंबी होईल, असा विश्वास मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे व्यक्त केला आहे.

मत्स्यव्यवसाय विभागाच्या मत्स्यखाद्य खरेदीसंदर्भात नवीन मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने आयोजित पत्रकार परिषदेत श्री. राणे बोलत होते.

मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे म्हणाले, सध्याच्या स्थितीत मत्स्यखाद्य मुख्यतः राज्याबाहेरून आयात करण्यात येत आहे. त्यामुळे स्थानिक उत्पादकांना प्रोत्साहन देण्यासाठी व गुणवत्तेवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागाने मार्गदर्शक सूचना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्रातील मत्स्यव्यवसाय वाढविण्याच्या दृष्टीने केंद्र व राज्य शासनाच्या अर्थसहाय्याने विविध प्रकल्प उभारण्यात आले आहेत. यामध्ये मत्स्यबीज उत्पादन व संवर्धन केंद्र, पिंजरा मत्स्यसंवर्धन प्रकल्प, बायोफ्लॉक, रास पद्धती व संगोपन तलाव आदींचा समावेश आहे. या प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गुणवत्तापूर्ण मत्स्यखाद्याची आवश्यकता आहे. राज्यातील सर्व अनुदानित मत्स्य प्रकल्पांनी केवळ राज्यातील केंद्र पुरस्कृत, राज्य शासनाच्या पथदर्शी, अनुदानित व नोंदणीकृत मत्स्यखाद्य उत्पादकांकडूनच मत्स्यखाद्य खरेदी करणे बंधनकारक राहील, असे मंत्री श्री. राणे म्हणाले.

या सूचनानुसार मत्स्यखाद्य भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण (घ्ण्घ/ँघ्ण / इएर्ऐंघ) प्रमाणित असणे गरजेचे आहेत. त्यावर प्रथिने, स्निग्ध, आर्द्रता, कर्बोदके इत्यादी पोषणमूल्यांचे विश्लेषण व उत्पादन तारीख, कालबाह्यता तारीख पॅकिंगवर स्पष्टपणे नमूद असावी. पुरवठ्याच्या वेळी अधिकृत पावती किंवा करबिल (ऊँ ध्नन्दग्म) देणे अनिवार्य आहे. मत्स्यखाद्य हवाबंद आणि सुरक्षित पॅकिंगमध्ये असणे गरजेचे असून कोरड्या व स्वच्छ वाहतूक साधनातून पुरवले जावे. पुरवठाधारकाची उएऊ नोंदणी आवश्यक आहे. मत्स्यखाद्य खरेदी करणाऱ्या शेतकऱ्यांची नोंद ठेवणे बंधनकारक आहे.

शाश्वत व पर्यावरणपूरक मत्स्य खाद्य उत्पादनास प्रोत्साहन देताना या अनुषंगाने गुणवत्तेबाबत शेतकरी व मच्छीमारांच्या तक्रारी आल्यास तात्काळ दखल घेतली जाईल असे मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी सांगितले.

दापवडीतील दत्तात्रय कळंबे महाराज विद्यालयाची कू. आकांक्षा गोळे शिष्यवृत्तीत चमकली ; मान्यवरांनी केला सत्कार

पाचगणी प्रतिनिधी प्रशांत थोरवे



भिलार : दापवडी (तालुका जावळी) येथील दत्तात्रय कळंबे महाराज विद्यालयाची कू. आकांक्षा प्रकाश गोळे हिने शिष्यवृत्ती परीक्षेत २१८ गुण मिळवून गुणवत्ता यादीत स्थान पटकावले आहे. याबद्दल आकांक्षाचा विविध मान्यवरांनी सत्कार केला.

दापवडी (ता.जावळी) येथील दत्तात्रय कळंबे महाराज विद्यालयातील कु. गोळे आकांक्षा प्रकाश, गोळे विघ्नेश गणेश ,कु.पोरे तन्वी विक्रम आणि बेलोशे सार्थक शिवाजी या चार विद्यार्थ्यांनी आठवी शिष्यवृत्तीत घवघवीत यश संपादन केले. येतील आकांक्षा गोळे हिने गुणवत्ता यादीत स्थान पटकावले याबद्दल आकांक्षा गोळे हिचा नुकताच माजी केंद्रप्रमुख शंकर बिरामणे, दत्तात्रय कळंबे महाराज नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन रविकांत बेलोशे, अश्वटेक कॉम्प्युटर अकॅडमीचे संचालक नितीन गावडे यांनी सत्कार केला.यावेळी दापवडी गावचे सरपंच महादेव रांजणे, सदाशिव रांजणे , मुख्याध्यापक पुंडलिक कांबळे , आर. एस. बुरुंगले , नितीन घाडगे , प्रतिभा जंगम , श्री. कुंभार सर यावेळी उपस्थित होते. आकांक्षा गोळे हिने शिष्यवृत्तीत यश मिळवून स्वतःबरोबरच शाळेचेही नाव उंचावले आहे. तिचा आदर्श इतर विद्यार्थ्यांनी घ्यावा तसेच शिक्षा वर्गानेही अधिकाधिक विद्यार्थी शिष्यवृत्ती सारख्या स्पर्धा परीक्षेत गुणवत्ताधारक व्हावेत यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन यावेळी माजी केंद्रप्रमुख शंकर बिरामणे यांनी केले.

दत्तात्रय कळंबे महाराज विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना भौतिकतसेच शालेय सुविधाही मुबलक उपलब्ध आहेत. शिक्षकही मेहनत घेत आहेत. या सर्वाचा पुरेपूर लाभ उठवत अशा प्रकारच्या स्पर्धा परीक्षांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी यश संपादन करावे. आणि आपले भवितव्य निश्चित करावे असे यावेळी रविकांत बेलोशे यांनी सांगितले. आकांक्षा गोळे हिने गुणवत्ता यादीत आपले स्थान पटकावले बद्दल तिचे कोयना एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष श्री किसनराव जाधव, सचिव डी. के. जाधव, संचालक बी. व्हि. शेलार, धोंडीराम जंगम आदीनी अभिनंदन केले आहे.

क्रशरविरोधी लॉन्ग मार्चमध्ये आमदार रोहित पवारांची एन्ट्री प्रशासनाला बंदीचा आदेश काढण्यासाठी ७ दिवसांचे अल्टिमेटम

वाई प्रतिनिधी प्रशांत थोरवे



लॉन्ग मार्चच्या ८व्या दिवशी रावेत पुणे येथे थांबलेला असताना सातारा जिल्हा प्रशासन लगबगीने तात्पुरता स्थगिती आदेश घेऊन लॉन्ग मार्चच्या ठिकाणी पोचले तर दुसऱ्या बाजूला आमदार रोहित दादा पवार यांच्या एन्ट्रीने आता या लढ्याला वेगळे स्वरूप निर्माण झाले आहे.

शासकीय अधिकाऱ्यांनी आंदोलनकर्त्यांना तात्पुरता स्थगिती आदेश स्वीकारावा अशी विनंती केली मात्र आंदोलनकर्ते आपल्या भूमिकेवर ठाम राहत जोपर्यंत आम्हाला दगडखाण व क्रशर बंद झालेला आदेश दिला जात नाही तोपर्यंत हा लॉंग मार्च असाच सुरू राहणार अशा पद्धतीचा निर्धार त्यांनी प्रशासकीय यंत्रणांसमोर केला.

दुसऱ्या बाजूला रोहित दादा पवार यांनी आंदोलनकर्त्यांना भेट देत त्यांच्या सर्व व्यथा ऐकून घेतल्या. शासनाच्या माध्यमातून अचानक ८ व्या दिवशी स्थगिती आदेश कसा काय दिला जातोय याबद्दल त्यांनी सर्वांचे लक्ष वेधले. लोकप्रतिनिधींना वेगळ्या खात्याचे डोहाळे लागल्यामुळे त्यात कोणतीही अडचण नको म्हणून हा स्थगिती आदेश देण्यात येतोय की काय अशी शंका त्यांनी उपस्थित केली. त्याचबरोबर त्यांनी या प्रकरणाशी निगडित सर्व अधिकाऱ्यांना अल्टिमेटम दिले आहे की पुढच्या सात दिवसांमध्ये या प्रकरणांमध्ये जर निष्पक्ष पद्धतीने चौकशी झाली नाही आणि या आंदोलनकर्त्यांना न्याय मिळाला नाही तर एकाही अधिकाऱ्याला सोडणार नाही असा सज्जड दमच त्यांनी भरला.

त्यामुळे या प्रकरणांमध्ये आता स्टोन क्रेशर बंदीचा आदेश आंदोलनकर्त्यांना मिळणार की हा विषय आणखी कोणाचे मंत्रिपद घालवणार हे आता येणाऱ्या काळात समजेलच.

आमदार रोहित दादा पवार यांनी आंदोलनकर्त्यांना दूरध्वनीवरून दिलेला शब्द पाळला व आंदोलन ठिकाणी येऊन आंदोलनकर्त्यांसोबत पंगतीला बसून जेवणाचा आस्वाद घेतला.

शाळेतील मुलांनी घेतला भात लागवडीचा आनंद

आंबेगाव/ प्रतिनिधी



आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागातील निगडाळे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी शेतावर जाऊन भात लागवडीचा अनुभव घेतला. क्षेत्रिय भेटीच्या माध्यमातून शाळेने हा उपक्रम आयोजित केला होता.

पावसाळ्यात शेतकरी शेतीची कामे करतो म्हणजे नक्की तो काय करतो,हे पुस्तकी ज्ञानापेक्षा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कळावे.शेतकरी घेत असलेल्या कष्टामुळे आपणास धान्य कसे उपलब्ध होते.नांगर म्हणजे काय,त्याचे काम काय.याची सर्वांगीण माहिती विद्यार्थ्यांना व्हावी,या विचारातून शाळेच्या मुख्याध्यापिका शोभा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी दुंदा कुऱ्हाडे यांच्या शेतावर प्रत्यक्ष भात लावणीचा अनुभव घेतला.

अनेक विद्यार्थ्यांनी बैलजोडीचा कुळव हाकत शेतात चिखलणी करण्याचे काम केले.शालेय गणवेशात विद्यार्थी शेतात उतरले होते.दिवसभर भात रोप लावणी,चिखलणीचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला.शेतीपासून दूर जाणारी युवा पिढी शेतीकडे वळावी,विद्यार्थ्यांमध्ये शेतीविषयी आवड निर्माण व्हावी,शेतीतील नव्या तंत्रज्ञानाबद्दल माहिती व्हावी,यासाठी 'एक दिवस बळीराजा' साठी हा उपक्रम राबविण्यात आल्याचे शाळेच्या मुख्याध्यापिका शोभा जाधव यांनी सांगितले.

पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रत्यक्ष अनुभवातून मिळणारे ज्ञान मुलांसाठी उपयुक्त असते,या जाणीवेतून भात लागवडीचे आयोजन करण्यात आले होते.आनंददायी पद्धतीने विद्यार्थ्यांनी भात लावणीचा प्रत्यक्ष अध्ययन अनुभव घेतला.भात रोपांची कशी लावणी करतात?हे मुलांना आज प्रत्यक्षात शेतावर शिकायला मिळाले.या उपक्रमासाठी शेतकरी सखुबाई कुऱ्हाडे,संगिता कुऱ्हाडे,विमल कुऱ्हाडे,जालिंदर कुऱ्हाडे,सुनिल कुऱ्हाडे,संजय कुऱ्हाडे यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अश्विनी लोहकरे,मुख्याध्यापिका शोभा जाधव,उपशिक्षक संतोष थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षणविस्तार अधिकारी शैला निमसे,केंद्रप्रमुख नयना चौधरी यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

उमरखेड तालुका कृषी अधिकारी कार्यालय उमरखेड व तहसील कार्यालय उमरखेड यांच्या वतीने महाराजस्व अभियानामध्ये शेतकऱ्यांना मार्गदर्शन

उमरखेड प्रतिनिधी लखन जाधव



उमरखेड तालुका कृषी अधिकारी कार्यालय उमरखेड व तहसील कार्यालय उमरखेड यांच्या वतीने महाराजस्व अभियानामध्ये शेतकऱ्यांना मार्गदर्शन उपप्रश्न उपक्रोशी अधिकारी सोमनाथ सर यांनी शेतकरी नोंदणी क्रमांक म्हणजेच ?ग्री स्टॅक याबाबत शेतकऱ्यांनी त्वरित शेतकरी नोंदणी क्रमांक काढून घेण्याबाबत आव्हान केले, तसेच सोयाबीनवर कापूस या पिकावरील हुमणी आळी च्या प्रादुर्भाव नियंत्रणासाठी शेतकऱ्यांनी उपाययोजना करण्याची गरज आहे याबाबत औषधी फवारणी करताना शेतकऱ्यांनी काळजी घेऊन शिफारशी शिपारीनुसार सोयाबीन व कापूस या पिकावर फवारणी करून हुमणे आळी आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करावा. भोज नगर रतन नाईक नगर बिटरगाव अकोली मन्याळी येथील शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त पिक विमा योजनेमध्ये सहभाग नोंदवून पीक नुकसानी पासून आपली आर्थिक हानी टाळावी याबाबत शेतकऱ्यांनी पिक विमा योजनेचा लाभ घ्यावा असे आव्हान सुद्धा करण्यात आलेले आहे. तसेच ऊस पिकावरील पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव आढळून आल्याने शेतकरी यांनी फवारणी करून ती पांढरी माशी आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करावा जेणेकरून ऊस उत्पादनात घट होणार नाही याबाबत सविस्तर असे मार्गदर्शन यावेळी करण्यात आले. या अभियानामध्ये कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा जसे की कृषी यांत्रिकीकरण सूक्ष्म सिंचन योजना एकात्मिक फलत्पादन अभियान गट प्रात्यक्षिके शेतीशाळा माती परीक्षण अहवाल तसेच स्वयंचलित हवामान केंद्र गाव स्तरावर उभारणी करणे याबाबत माहिती उपस्थित असणाऱ्या पंचक्रोशीतील नागरिकांना देण्यात आली. यावेळी बिटरगाव महसूल मंडळ मधील सर्व ग्राम महसूल अधिकारी सहाय्यक कृषी अधिकारी ग्राम विकास अधिकारी व महसूल सेवक कृषी मित्र पोलीस पाटील गावातील सरपंच व समस्त ग्रामस्थ या महाराज स्वाभिनायकथा उपस्थित होते.

सातारा महामार्ग लोणंदला विकासाकडून नव्हे तर भकासा कडे नेणारा आहे ; स्वर्ण गाथा प्रतिष्ठानचे अध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस ,(शरद पवार गट) डॉक्टर विकास सावंत !

सातारा जिल्हा प्रतिनिधी/ पांडुरंग कुंभारः



शिरवळ लोणंद सातारा महामार्गाचे काम लवकरच सुरू होत आहे हा महामार्ग शिरवळ लोणंद साताराआसा जाणार आहे या महामार्गाची २२ मीटर रुंदीचा असून हा महामार्ग लोणंदच्या मुख्य रस्त्यावरून जात आहे म्हणून अनेक व्यापाऱ्यांचे अतोनात नुकसान होऊन बाजारपेठेतील सर्व दुकानदारांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागणार आहे तसेच अनेक दुकानांचे नुकसान होणार आहे महामार्ग लोणंदचा विकास करणारा नसून बाजारपेठ भकास करणार आहे आसे सुवर्णगाथा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉक्टर नितीन सावंत यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले या महामार्गाला आमचा सक्त विरोध आहे हा महामार्ग लोणंद शहराच्या बाहेरून करण्यात यावा तसेच अपघात व ट्रॅफिक जमची समस्या होऊ नये म्हणून लोणंद नगरपंचायत चे मुख्याधिकारी दत्तात्रेय गायकवाड साहेब यांना निवेदन देण्यात आले की या निवेदन देते प्रसंगी या महामार्गाचे लोणंद चे कसे नुकसान होणार आहे ते मुख्याधिकारी दत्तात्रेय गायकवाड साहेबांना निवेदन द्वारे सांगण्यात आले निवेदन देताना राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) व सामाजिक कार्यकर्ते रघुनाथ शेळके सरानी आपले मनोगत व्यक्त केले याप्रसंगी राजाभाऊ खरात भावेश जोशी राजू भाई इनामदार योगेश डोईफोडे उपस्थित होते

गुणवंत विद्यार्थी ,पालकांचा सत्कार समारंभ संपन्न

प्रतिनिधी/सातारा



श्री मळाई देवी शिक्षण संस्थेचे,आ.च. विद्यालय व आदर्श ज्युनिअर कॉलेज, मलकापूर येथील इ.१० वीमधील सन २०२४-२५ मधील प्रथम पाच क्रमांक प्राप्त गुणवंत विद्यार्थी, शिष्यवृत्तीधारक यशवंत विद्यार्थी, तसेच विविध स्पर्धा परीक्षेतील उज्वल यश संपादन केलेले विद्यार्थी आणि विद्यालयातील आदर्श विद्यार्थी व विद्यार्थिनींचा त्यांच्या पालकांसमवेत सत्कार समारंभ संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे कॉलेज,कराडचे प्राध्यापक मा. श्री.विश्वनाथ सुतार अध्यक्षा श्रीमती हसीना मुजावर भरोसा सेल, कराडच्या पोलीस हेडकॉन्स्टेबल,कराडच्या सोशल वर्कर,सौ. मनीषा महाडिक,शेती मित्र मा.अशोकराव थोरात,मा.गुणवंतराव जाधव, मा.शिवाजीराव धुमाळ,मा. भास्करराव मोहिते, मा.जयवंतराव कराळे, मा.ज्ञानदेव कवळे,श्रीमती तारामती पारवे,सौ.सुजाता भावके, मा.शेखर शिर्के, मा.संजय तडाखे,मा.पी.जी. पाटील (अध्यक्ष,श्रीमळादेवी शिक्षण संस्था) तसेच संस्थेचे सर्व संचालक, पदाधिकारी व पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकात मुख्याध्यापिका सौ.ए.एस.कुंभार यांनी इ.१० वीतील सर्व यशस्वी विद्यार्थी,स्पर्धा परीक्षेतील सर्व यशस्वी विद्यार्थी यांचे कौतुक केले व भावी वाटचालीस शुभेच्छा देऊन यशाची शिखरे गाठण्याचा संदेश दिला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा.प्रा. विश्वनाथ सुतार यांनी विद्यार्थ्यांना मोबाईलचे फायदे व तोटे सांगताना मोबाईल हे आधुनिक ज्ञानाचे विद्यापीठ आहे,त्याचा योग्य वापर केला पाहिजे, तसेच आयुष्यात कोणतेही ध्येय प्राप्त करायचे असेल तर कोणत्याही परिस्थितीला घाबरू नका व लाजू नका असा संदेश दिला. आणि सर्व विद्यार्थी गुणवंत असतानच पण यशवंत होण्याचा नेहमी प्रयत्न केला पाहिजे असे उपदेशपर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा मा.श्रीमती हसीना मुजावर यांनी विद्यार्थ्यीं विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे दिले. तसेच मैत्री ही जाणून घेऊन केली पाहिजे,संस्काराने संस्कृती वाढत असते,ज्येष्ठांचा मान सन्मान करावा व आयुष्यात खूप मोठे यश प्राप्त करावे असा संदेश दिला.

मा.श्री.अशोकराव थोरात(शेतीमित्र-सचिव,श्री मळाई देवी शिक्षण संस्था) यांनीही विद्यार्थ्यांना यशस्वी आयुष्य जगण्याचे व ध्येय प्राप्त करण्याचे कानमंत्र दिले.त्याचबरोबर मान्यवरांच्या हस्ते सर्व यशस्वी व गुणवंत,यशवंत विद्यार्थ्यांचा पुरस्कार देऊन सन्मान व सत्कार करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांच्या पालकांचाही सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे पर्यवेक्षक श्री.बी.जी.बुरुंगले यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले तसेच या कार्यक्रमास अनेक मान्यवर, समाजातील दानशूर पालक, शिक्षक, शिक्षकेतर व विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सागरआप्पा दंडवते यांचा सामाजिक जाणीवेने भरलेला अनोखा वाढदिवस : १५,००० वह्यांचे वाटप, गुणवंतांचा सन्मान, अन्नदान आणि खेळाडूंना प्रोत्साहन

शिरूर शहर (पुणे)प्रतिनिधी- अविनाश घोगरे



शिरूर, युवा उद्योजक आणि सामाजिक कार्यकर्ते सागर (आप्पा) खासेराव दंडवते यांनी आपला वाढदिवस सामाजिक भान, शिक्षणप्रेम आणि कर्तव्यभावना जपत अनोख्या आणि विधायक पद्धतीने साजरा करत एक आदर्श निर्माण केला. पारंपरिक जल्लोषाऐवजी विद्यार्थ्यांना आणि गुणवंतांना मदत करून त्यांनी हा दिवस लोकहितार्थ समर्पित केला.

या अनोख्या उपक्रमाअंतर्गत शिरूर तालुक्यातील इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना एकूण १५,००० वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले. शिक्षणसामग्रीच्या या मदतीमुळे अनेक विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले.

वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये शैक्षणिक, प्रशासकीय, क्रीडा आणि वैद्यकीय क्षेत्रात योगदान देणाऱ्या युवा व्यक्तींना गौरवण्यात आले.

या वेळी प्रमुख पाहुणे प्रा. वसंत हंकारे यांनी उपस्थित युवकांना मार्गदर्शन करताना सांगितले की,

'आई-वडिलांच्या त्यागाची जाणीव ठेवून तरुणांनी व्यसनांपासून दूर राहावं. मुलींनी खोट्या प्रेमाच्या जाळ्यात अडकू नये. आपल्या वर्तनाने आई-वडिलांचा अभिमान वाढवावा.' सन्मानित व्यक्तींची यादी पुढीलप्रमाणे, स्वाभिमान शिंदे - धाराशिव येथील युवा कबड्डीपटू, अभिजित गायकवाड - विक्रीकर अधिकारी , शुभम शिंदे - सनदी लेखापाल , अनिल शिंदे - पुणे ग्रामीण पोलीस दल , प्रशांत कोठावळे - राज्य राखीव पोलीस बल, शुभम गोडसे, प्रतीक्षा भोसले, माधुरी गडदरे वैद्यकीय क्षेत्रातील योगदानासाठी, खुशी इनामदार उदयोन्मुख बॅडमिंटनपटू , सावी ताठे-तलवारबाजीतील विशेष यशासाठी पूर्व माध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचा देखील या कार्यक्रमात गौरव करण्यात आला. त्यांचं कष्ट आणि मेहनतीला दिलेली ही दाद विशेष कौतुकास्पद ठरली.

या कार्यक्रमात सर्वांचे लक्ष वेधून घेतलं ते धाराशिव जिल्ह्यातील जिद्दी युवा कबड्डीपटू स्वाभिमान धनंजय शिंदे याने. अत्यंत प्रतिकूल आर्थिक परिस्थिती असतानाही कबड्डीचा सातत्याने सराव करणाऱ्या या खेळाडूचा रु. ५१,१११/- च्या प्रोत्साहनपर रोख बक्षिसाने सन्मान करण्यात आला.

यावेळी सागरआप्पा दंडवते यांनी एक महत्त्वपूर्ण जाहीर वक्तव्य करत सांगितले,'कोणत्याही खेळाडूला दुखापत झाल्यास त्यावर होणाऱ्या संपूर्ण उपचार खर्चाची जबाबदारी मी स्वतः घेईन. खेळाडूंमागे समाज उभा राहायला हवा, ही माझी भूमिका आहे.'

सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवत शिरूर येथील अनाथालयातील सर्व विद्यार्थ्यांना अन्नदान करून त्यांनी वाढदिवसाचा खरा अर्थ साकारला. अनाथ मुलांचे आशीर्वाद घेत हा दिवस त्यांनी समाजासाठी समर्पित केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य अनिल शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन अविनाश गायकवाड व राजेंद्र लष्करे यांनी अतिशय नेटकेपणे पार पाडले, तर प्रा. सुदाम गायकवाड यांनी मनःपूर्वक आभार प्रदर्शन केले.

सागर दंडवते यांचा हा उपक्रम तरुणांसाठी प्रेरणादायी ठरला असून, त्यांनी सामाजिक भान जपत वाढदिवस विधायकतेने साजरा करण्याचा नवा आदर्श समाजासमोर ठेवला आहे.

राजाराम पंडित बंधुत्व जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित !

प्रतिनिधी/सातारा



येथील सुरभी हाईट्समधील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते राजाराम सदाशिव पंडित (आण्णा) यांना बंधुत्व जीवनगौरव पुरस्कार संस्थापक अनिल वीर,अंनिसचे प्रशांत पोतदार व ?ड.हौसेराव धुमाळ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.यावेळी सागर सुर्ले,सौ. पोतदार उपस्थीत होत्या. पुरस्काराचे स्वरूप सन्मानिका, सन्मानपत्र, पुस्तक,शाल व पुष्पगुच्छ असे होते.

अण्णांनी वयाची ८१ वर्षे पूर्ण केली आहेत.त्यांनी आपुलकीच्या नात्याने मित्रपरिवार सामाजिक भावनेने एकसंघ ठेवला आहे. त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्वाबद्धल तसेच नातेवाईक यांच्यात लोकप्रिय असलेले अण्णा आहेत.त्यांचे मूळचे गाव हंगा,ता.पारनेर, जिल्हा - अहिल्यानगर आहे. त्यांनी कृषी सहायक या पदावर मृद संधारण खात्यात ३७ वर्षे सेवा केली होती.प्रत्येकी १५ वर्षे कोकण व नाशिक येथे सेवा बजावली तर धुळे येथे ७ वर्षे अशी सेवा करून स्वच्छंदी व आनंदी राहत आहेत. ते सातारा येथेच पेन्शनरच्या सिटीत सुरभी हाईट्समध्ये गेली १३ वर्षे झाली वास्तव्यास आहेत.त्यांनी मनापासून साता?ला आपलेच मानले आहे.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वसुधा क्षीरसागर व त्यांच्या भगिनींनी अथक असे परिश्रम घेतले.यावेळी अण्णांच्या गौरवार्थ पोपट मोरे,सतीश कुलकर्णी,विविध क्षेत्रातील मान्यवर व नातेवाईक यांनी मनोगत व्यक्त केली.सौ. जयश्री दीक्षित यांनी आभार मानले.सदरच्या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर,ज्येष्ट नागरीक मित्र परिवार,सुरभी हाईट्समधील परिवार, नातेवाईक व नागरीक मोठ्या संख्येनी उपस्थीत होते.

वर्धेतील पहिल्याच शिबिरात ८ हजार ७५२ रुग्णांची तपासणी मोतीबिंदू विरहित वर्धा जिल्हा अभियानास प्रतिसाद





प्रतिनिधी/वर्धा

जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या संकल्पनेतून आयोजित मोतिबिंदू विरहित वर्धा जिल्हा अभियानाच्या वर्धा येथील पहिल्याच शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरात तब्बल ८ हजार ७५२ रुग्णांची मोतिबिंदू, दंत व इतर आजारांची तपासणी करण्यात आली. तपासणीत शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या १ हजार ८२ रुग्णांवर विनामुल्य मोतिबिंदू शस्त्रक्रिया केली जाणार आहे.

पालकमंत्र्यांच्या सूचना व जिल्हा प्रशासनाच्या सांघित समन्वयाने शिबिराचे सुक्ष्म नियोजन, व्यवस्थापन करण्यात आले होते. त्यामुळेच शिबिर उत्तमपणे रुग्णांच्या चांगल्या प्रतिसादाने पार पडले. शिबिराच्या दिवशी काही वेळ पाऊस असतांना सुद्धा नागरिकांची उपस्थिती होती. तर त्याच उत्स्फूर्तपणे तज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी केली. विविध सामाजिक संघटना देखील दिवसभर रुग्णांच्या सेवेसाठी कार्यरत होत्या.

या शिबिरात ८ हजार ७५२ नागरिकांनी नोंदणी केली. त्यामध्ये ३ हजार २५९ पुरुष व ५ हजार ३६४ महिलांचा समावेश होता. तसेच ७५ बालक व ५४ बालिकांची सुध्दा नोंदणी करण्यात आली. शिबिरात डोळ्यांची तपासणी केलेल्या पात्र १ हजार ८२ रुग्णांची मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठी निवड करण्यात आली आहे. २ हजार ७११ नागरिकांना विनामुल्य चष्माचे वितरण करण्यात आले आहे. शिबिरात झालेल्या एकूण नोंदणीपैकी ५ हजार ६६४ नागरिकांनी नेत्र तपासणी करण्यात आली. त्यामध्ये २ हजार ४४२ पुरुष व ३ हजार २१८ महिलांचा समावेश आहे. यावेळी २ हजार १५० नागरिकांची दंत तपासणी करण्यात आली. ३ हजार ७१३ नागरिकांची असंसर्गजन्य आजाराची तपासणी करण्यात आली. २२७ नागरिकांची ईसीजी व ५ हजार २४२ नागरिकांची सामान्य तपासणी करण्यात आली. सर्व तपासण्या तज्ञ डॉक्टरांच्यावतीने करण्यात आल्या.

यावेळी ५४६ नागरिकांनी नवीन आयुष्यमान भारत कार्ड काढण्यासाठी नोंदणी केली. त्यामध्ये २४१ पुरुष तर ३०५ महिलांनी आयुष्यमान भारत कार्ड काढले. नेत्र तपासणी केलेल्या २ हजार ७११ नागरिकांना विनामुल्य रत्ननिधी चॅरीटेबल ट्रस्ट व जीवन ज्योती कॅन्सर रिलिफ ?ण्ड केअर स्ट्रस्ट मुंबई यांच्यामार्फत चष्माचे वितरण करण्यात आले. या शिबिरात प्रियदर्शनी महिला विकास संस्था अंतर्गत महिलांचे मानसिक आरोग्य व कायदेशिर समुपदेशन करण्यात आले. मुख्यमंत्री निधी धर्मदाय मदत कक्षामार्फत शिबिरात लाभ देण्यात आला.

या अभियानाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा प्रशासन, कस्तुरबा हॉस्पीटल सेवाग्राम, आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी मेघे, वर्धा नेत्र तज्ज्ञ संघटना, आयएमएम व स्वयंसेवी संस्थेच्या कार्यकत्यांचे मोठे योगदान लाभले.

वर्धा येथे पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा संपन्न



प्रतिनिधी/वर्धा

जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व लोक महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने लोक महाविद्यालय वर्धा येथे पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे उद्घाटन जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्ष वैशाली येरावार यांचेहस्ते झाले. यावेळी लोक शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त निता औघड, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य संजय कोकुलवार, लोक विद्यालयाचे प्राचार्य रुपेश रामगडे यांची उपस्थिती होती.

मेळाव्यात १३ नामांकित कंपन्या सहभागी झाल्या होत्या. त्यामध्ये सत्या मायक्रो कॅपीटल, बजाज कॉलेज ऑफ सायन्स, जेनेटक लाईफ, दत्ता मेघे इन्सिट्यूट, वैभव एंटरप्रायजेस, संसुर सुष्ठी, भारतीय जीवन विमा, प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन, उत्कर्ष स्मॉल फायनांस, धन्वंतरी डिस्ट्रीब्युटर आदी कंपन्यांचा समावेश होता. फिल्ड ऑफिसर, ऑडिट ट्रेनिंग, सेल्स ट्रेनिंग, ऑफीस असिस्टंट अशा विविध पदांसाठी उमेदवारांची निवड करण्यात येणार होती. उपस्थित उमेदवारांपैकी ५४ उमेदवारांची प्राथमिक निवड यावेळी करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक सहाय्यक आयुक्त निता औघड यांनी केले. यावेळी डॉ. गजानन कोटेवार, वैशाली येरावार यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. सिमा भगत यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. वैशाली बोरसरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लिपीक सुवर्णा थेरे, यश भागवत यांनी परिश्रम घेतले.

सुधारित पिकविमा योजनेत शेतकऱ्यांनी सहभाग घ्यावा

जिल्हाधिकारी वान्मथी सी यांचे आवाहन : सहभागासाठी ३१ जुलै शेवटची तारीख



प्रतिनिधी/वर्धा

नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. अशा नुकसानीच्या प्रसंगी शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी शासनाने प्रधानमंत्री पिकविमा योजना सुरु केली आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या सुधारीत पिकविमा योजनेत मोठ्या प्रमाणावर सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी केले आहे.

राज्यात दरवर्षी निर्माण होणाऱ्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्यासाठी प्रधानमंत्री पिक विमा योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात खरीप हंगामासाठी अधिसूचित पिकांमध्ये सोयाबीन, कापूस, तूर, भुईमूग, उडीद, मुंग या पिकांचा प्रामुख्याने समावेश आहे.

अधिसूचित क्षेत्रातील शेतकऱ्यांना या योजनेत सहभाग घेता येतो. योजनेत सहभागी होण्याची अंतिम तारीख दि.३१ जुलै आहे. योजनेत सहभाग होण्याकरिता जवळच्या सेतू केंद्रामध्ये जाऊन आपल्या पिकाचा विमा उतरवून घ्यावा, असे जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना केले आहे.

नित्रुड ते मोकुळ तांडा रस्ता चिखलाने माखल्याने विद्यार्थी व नागरिकांचे बेहाल प्रशासन गांभीर्य घेणार का...?





तेलगाव सोमेश्वर सोनटक्के

माजलगाव तालुक्यातील नित्रुड ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या नित्रुड ते मोकुळतांडा, रेखानाईक, चंद्रभान तांडा,बडेवाडी या सह तांडे,वाड्या,वस्त्या वरील रस्ता पावसाने चिखलमय झाला असुन यावर दररोज प्रवास करणारे हजारो नागरिक व शाळकरी विद्यार्थ्यांचे जिवित्व धोक्यात आले आहे.त्यामुळे या रस्त्यावर तात्काळ उपाययोजना करून नित्रुड ते रेखानाईक मोकुळतांडा अंतर ३कि.मी व नित्रुड ते बडेवाडी अंतर १कि.मी या रस्ता दुरूस्तीच्या कामाकडे लोकप्रतिनिधी व संबधितांनी लक्ष देवून शालेय विद्यार्थी, शेतकरी व नागरिकांची होणारी दैना थांबवावी अशी मागणी निखील जाधव यांनी केली आहे.

यासंदर्भात अधिक माहिती अशी की,नित्रुड ते रेखानाईक मोकुळतांडा,व बडेवाडी सह तांडे वाड्या वस्तीवरील रस्त्यावर पावसाने रस्त्यावर चिखल होवून दयनीय अवस्था झाली असून मोठ्या प्रमाणात चिखलाचे साम्राज्य पसरले असून रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले आहेत.रस्त्यावरून प्रवास करतांना वहान चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे.चिखलामुळे दुचाकी वाहन घसरत आहेत.नागरिकांना प्रसूती अपघात या सारख्या आपत्कालीन रूग्णांना दवाखान्यात नेण्यात अडचण येत आहे.या रस्त्याविषयी अनेक वेळा पाठपुरावा करण्यात आला.माञ रस्त्याची समस्या निकाली काढण्यात शासन व लोकप्रतिनिधी अपयशी ठरले असल्याचे चित्र पहायला मिळत आहे.शासन ग्रामीण भागातील नागरिकांना मोजता ही न येणाऱ्या संख्ये ऐवढे रूपये खर्च करून महामार्ग आणी मतदानाचा सोयिचा ठिकाणचे रस्त्ये करण्यास व्यस्त आहेत.इ'माञ ग्रामीण भागातील रस्त्याकडे लोकप्रतिनिधी व शासनाचे दुर्लक्ष का...'?ङअशा संतापजनक सवाल देशसेवा करणारे रेखानाईक तांडा येथील रहिवासी निखिल भैय्या जाधव व ग्रामीण भागातील नागरिक व शालेय विद्यार्थी विचारत आहेत.निञुड ग्रा.प.अंतर्गत मोकुळतांडा ,रेखानाईक चंद्रभान,बडेवाडी, जाधव नगर,जानुनाईक तांडा यांच्या सह तांडे ,वाड्या,वस्त्यावर नागरिकांनी स्व खर्चाने रस्त्यावर मुरूम टाकुन दूरूस्ती करण्यात आली.माञ सध्या सुरू झालेल्या पावसामुळे हे रस्ते पुन्हा जैसे थे झाले आहेत.त्यामुळे शालेय विद्यार्थीसह, शेतकरी वर्ग , नागरिक प्रशासन व लोकप्रतिनिधींच्या नावाने बोटे मोडित आहेत.लोकप्रतिनीधी व प्रशासनाने याची दखल घेवून शालेय विद्यार्थी शेतकरी,व नागरिकांची होणारी दैना थांबवावी अशी मागणी देश सेवा करणारे निखील जाधव यांच्या सह नागरिकांन कडून होत आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या माहिती पोस्टरचे विमोचन



प्रतिनिधी/वर्धा

तालुका कृषि अधिकारी कार्यालय, वर्धा येथे प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात शेतकऱ्यांसाठी उपयुक्त असलेले भारतीय कृषि विमा कंपनीद्वारे तयार करण्यात आलेले प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या माहिती पोस्टरचे विमोचन करण्यात आले.

प्रधानमंत्री पीक विमा ही योजना शेतकऱ्यांसाठी अत्यंत लाभदायक असल्याने अधिकाधिक शेतकऱ्यांनी या योजनेत सहभाग घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमास कृषी अधिकारी पी.आर. चाफले, मंडळ कृषी अधिकारी आर.ओ. वानखेडे, उप कृषी अधिकारी जे.एम. मडावी, एस.आर. गेडाम याच्यासह कार्यालयातील कर्मचारी, तसेच भारतीय कृषी विमा कंपनीचे तालुका प्रतिनिधी अमर कांबळे उपस्थित होते.

'राम फटाले' यांच्या कुटुंबीयांना बीड शहर बचाव मंचच्या पदाधिका-यांनी घेतली सांत्वन भेट सावकारांना कठोर शासन करा- बीड शहर बचाव मंचाची मागणी

बीड/प्रतिनिधी

सावकारीच्या महाभयानक अत्याचारातून अनेक वर्ष होरपळून निघत असलेल्या फटाले कुटुंबीयांची बीड शहर बचाव मंचाच्या पदाधिकाऱ्यांनी काल भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी मयत झालेले राम फटाले यांचे मोठे चुलते ज्येष्ठ पत्रकार द्वारकादास फटाले हे ही उपस्थित होते.

'राम फटाले' यांच्या कुटुंबीयांना बीड शहर बचाव मंचच्या पदाधिका-यांनी घेतली सांत्वन भेट : सावकारांना कठोर शासन करा- बीड शहर बचाव मंचाची मागणी



यावेळी फटले कुटुंबीयांनी मागील अनेक वर्षापासून पेठ, बीड टकारवाडा भागातील महाभयानक , क्रूरतेचा कळस असलेल्या व महाअत्याचारी सावकार कुटुंबीयांच्या जाळयात कशा पद्धतीने अडकत गेलो व त्यांनी अनेक वर्षांपासून कशा पद्धतीने शोषण केले याचा पाढा वाचला. तसेच अनेक वेळेस राम फटाले यांना व्याजाच्या पैशापोटी दिवस-दिवस सावकाराने घरात कोंडून ठेवून अमानुषपणे मारहाण केल्याची माहिती त्यांचे वडील, चुलते व भाऊ यांनी सांगितली. शिवाय २०२१ -२२ च्या लॉकडाऊन काळातही या सावकाराला मुद्दल व्याजासह पैशाची परतफेड करूनही तारण ठेवलेले चेक , बॉण्ड्स इतर कागदपत्रे हा परत देत नव्हता व आज पर्यंत परत दिलेली नाहीत. सतत व्याजाच्या पैशासाठी राम फाटले यांच्यासह घरातील महिलांना शिवीगाळ करणे,

जिवे मारण्याच्या धमक्या देऊन मोठा त्रास दिला. हा त्रास सहन न झाल्याने फटाले यांनी आत्महत्या करून जीवन संपविले असल्याचे सांगितले. यावेळी फटाले कुटुंबीयांना बीड शहर बचाव मंचाने आम्ही तुमच्या पाठीशी तुम्हाला न्याय मिळेल पर्यंत खंबीरपणे उभे राहणार असल्याचे सांगितले. यावेळी बीड शहर बचाव मंचाचे कायदेशीर सल्लागार ?ड.अनिलजी बारगजे यांनी या कुटुंबीयांचे वकीलपत्र एक रुपया न घेता स्वखर्चाने स्वीकारले आहे.

तरी पोलीस विभागाने या प्रकरणाची सखोल व योग्य पद्धतीने तपास करून

पीडित कुटुंबीयांना न्याय मिळवून द्यावा. या प्रकरणातील दोषींना पाठीशी घालू नये अशी मागणी बीड शहर बचाव मंचाचे अध्यक्ष नितीनजी जायभाये,आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अशोकराव येडे, इंटक काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष रामधन जमाले, बचाव मंचचे मार्गदर्शक सुधीरभाऊ देशमुख, संपादक पत्रकार बालाजी जगतकर आदी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष : वैद्यकीय उपचार व शस्त्रक्रियांसाठी अर्थसहाय्य



प्रतिनिधी/वर्धा

कोणत्या वयात कोणता आजार होईल सांगता येत नाही. अशा आजारांवर फार मोठ्या प्रमाणावर खर्च होतो. हा खर्च सर्वसामान्य गरीब रुग्णांना परवडण्यासारखा नसतो. त्यामुळे दुर्बल घटकातील रुग्णांना दुर्धर आजारांवरील उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाच्यावतीने अर्थिक मदत दिली जाते. जिल्ह्यासह राज्यात हजारो रुग्णांना कक्षाने मदतीचा हात दिला आहे. आता जिल्हाधिकारी कार्यालयातच मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष स्थापन करण्यात आला असून रुग्णांना या कक्षाची मदत होत आहे.

मुख्यमंत्री सहायता कक्षाची आर्थिक मदत मिळण्यासाठी रुग्ण महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक आहे. रुग्णाच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न १ लाख ६० हजार रुपयापेक्षा जास्त नसावे. तसेच रुग्ण आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू नागरिक असावे.

जिल्हास्तरीय कक्षाचे कामकाज : जिल्हाधिकारी कार्यालयात स्थापन करण्यात आलेल्या मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्यावतीने रुग्ण अर्जदाराला अर्ज भरुन दिला जातो. रुग्णांच्या आजाराचे निदान, सर्व आवश्यक रक्त तपासनी व इतर आजारासंबंधी अहवाल पडताळणी केली जाते. संबंधित रुग्णालय व डॉक्टरांकडून खर्चाचे अंदाजपत्रक घेतले जाते. आवश्यक कागदपत्र जोडून अर्ज मुख्यमंत्री सचिवालय, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, मुंबईच्या ई-मेल-आयडीवर हा ईमेलवर पाठविला जातो. प्रस्तावास मंजूरी मिळाल्यानंतर निधी थेट रुग्णालयास वर्ग केला जातो.

धर्मादाय रुग्णालय निधी : धर्मादाय रुग्णालय निधीचा लाभ मिळण्यासाठी रुग्णाने दारिद्यरेषेखालील, अंत्योदय कार्ड तसेच शासकीय ओळखपत्र सादर करणे आवश्यक आहे. या रुग्णालयात उपचार घेण्यासाठी रुग्णाने सादर केलेल्या अर्जाची ४८ तासात पडताळणी करून अर्ज सादर केला जातो. जिल्हा मदत कक्षाच्यावतीने ७२ तासाच्या आत मान्यता देऊन धर्मादाय रुग्णालयातून खाट उपलब्ध करुन दिल्याबाबतचे मान्यता पत्र रुग्णास कळविले जातात. त्यानंतर रुग्णास रुग्णालयात दाखल करण्याबाबत कक्षामार्फत सहाय्यता करण्यात येते. रुग्ण रुग्णालयातून डिस्चार्ज होईपर्यंत कक्षातील अधिकारी, कर्मचारी रुग्णाच्या संपर्कात राहतात.

अर्जासाठी आवश्यक कागदपत्र : विहीत नमुन्यातील अर्ज, निदान व उपचारासाठी लागणाऱ्या वैद्यकिय खर्चाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. खाजगी रुग्णालय असल्यास जिल्हा शल्य चिकित्सकांद्वारे प्रमाणित करुन घेतले असावे. चालू वर्षाचा १ लाख ६० हजार पेक्षा कमी उत्पन्नाचा दाखला, रुग्ण दाखल असल्यास रुग्णाचा फोटो, रुग्णांचे आधारकार्ड, लहान बालकाच्या बाबतीत बालकाच्या मातेचे आधारकार्ड, रुग्णांचे रेशनकार्ड, संबंधित आजारांचे संबंधित अहवाल असणे आवश्यक आहे. अपघातग्रस्त रुग्णांसाठी एमएलसी रिपोर्ट आवश्यक आहे. प्रत्यारोपण रुग्णांसाठी झेडटीसीसी, शासकीय समितीची मान्यता आवश्यक आहे. रुग्यालायाची नोंद मुख्यमंत्री सहाय्यता निधी कार्यालयाच्या संगणक प्रणालीवर असणे आवश्यक आहे.

अर्थसहाय्यासाठी विकार, आजारांची यादी : कॉकलियर इम्प्लांट, अंतस्त कर्णरोपण शस्त्रक्रिया वय २ वे ६ वर्ष, हृदय प्रत्यारोपण, यकृत्र प्रत्यारोपण, मूत्रपिंड प्रत्यारोपण, फुफ्फुस प्रत्यारोपण, अस्थी मज्जा प्रत्यारोपण, हाताचे प्रत्यारोपण, खुब्याचे प्रत्यारोपण, कर्करोग शस्त्रक्रिया, कर्करोग औषधोपचार किरणोपचार, अस्थिबंधन, नवजात शिशुचे संबंधित आजार, गुडघ्याचे प्रत्यारोपण, रस्ते अपघात, लहान बालकांच्या संबंधित शस्त्रक्रिया, मेंदुचे आजार, हृदयरोग, डायलिसिस, जळीत रुग्ण, विद्युत अपघात, विद्युत जळीत रुग्ण आदी उपचार, शस्त्रक्रियांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.

जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहायता कक्ष व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षात कक्षाच्या अध्यक्ष तथा वैद्यकीय अधिकारी डॉ किमया गंधे, सदस्य तथा समाजसेवा अधीक्षक प्रविण लांबाडे तर सदस्य तथा कनिष्ठ लिपिक म्हणून मोनिका मुराई हे कामकाज सांभाळत आहे. या कक्षाचा लाभ घेण्यासाठी रुग्ण यांच्याशी संपर्क साधू शकतात. तसेच १८००१२३२२११ या टोल फ्री कमांकावर देखील संपर्क साधता येतो.

तळेगाव ढमढेरे ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी स्वाती लांडे बिनविरोध

रांजणगाव गणपती प्रतिनिधी :बाळासाहेब कुंभार



शिरूर तालुक्यातील राजकीय पटलावरील महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या आणि बहुचर्चित तळेगाव ढमढेरे ग्रामपंचायतच्या सरपंचपदी स्वाती बाळासाहेब लांडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. सरपंच अंकिता भुजबळ यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर निवडणूक घेण्यात आली. स्वाती बाळासाहेब लांडे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बहुमताने निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून गणपत मळभर तर राजेंद्र सात्रस ग्रामपंचायत अधिकारी यांनी त्यांना सहकार्य केले.

नवनिर्वाचित सरपंच निवडीने गावामध्ये मोठ्या प्रमाणात आनंद उत्सव साजरा करण्यात आला. ढोल ताशांच्या गजरात ग्रामपंचायत कार्यालय ते कृषी उत्पन्न बाजार समिती वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. उपबाजार आवारातील महात्मा फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून गुलाल विरहित जंगी मिरवणूक काढण्यात आली असून गुलाल ऐवजी फुलांची उधळण करण्यात आली. ग्रामपंचायत सदस्य, कार्यकर्ते हे सर्व फेटे बांधून रॅलीमध्ये सहभागी झाल्याने वातावरण भगवेमय झाले होते.

संत शिरोमणी सावता महाराज मंगल कार्यालय मध्ये झालेल्या सभेमध्ये अनेक मान्यवरांनी नवनियुक्त सरपंच स्वाती लांडे व त्यांचे पती सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब लांडे यांनी केलेल्या प्रामाणिक समाजकार्यामुळेच त्यांना गावची सेवा करण्यासाठी सरपंचपद बिनविरोध मिळाल्याचे सांगत आनंद व्यक्त केला.

नवनिर्वाचित सरपंच स्वाती लांडे त्यांच्याकडे मागील उपसरपंच पदाचा दांडगा अनुभव तसेच त्यांचा असणारा मोठा जनसंपर्क, सर्वांप्रती आपुलकीची वागणूक, सर्व गुणसंपन्न नेतृत्व असल्याने खऱ्या अर्थाने पुढील काळात गावच्या विकासाला चालना मिळणार आहे . सामाजिक क्षेत्रातील अग्रेसर असणाऱ्या कुटुंबाला गाव कारभारी होण्याची संधी मिळाल्याने गावच्या विकासाला गती मिळणार आहे.

तळेगाव ढमढेरे गावामध्ये तब्बल दहा वर्षापासून विकासाचा वेग मंदावलेला असल्याने सर्व सामान्य थरातून सूर आहे. अनेक प्रलंबित प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने आठवडे बाजार, गावात होणारी वाहतूक कोंडी, कचऱ्याचा गंभीर बनत चाललेला प्रश्न, दिवसेंदिवस वाढत चाललेले शहरीकरण त्यामुळे गावाला बकालपणा येत असून ऐतिहासिक वारसा असणाऱ्या गावचे जतन संवर्धन करत असताना, गावातील एकोपा अखंडित ठेवण्यासाठी , गावचा सर्वांगीण विकासासाठी विशेष उपाययोजना करण्यासाठी नवनियुक्त सरपंचाचा कस लागणार आहे. नवनियुक्त सरपंच स्वाती लांडे यांची बिनविरोध निवड झाल्याने सर्व स्तरातून त्यांचे विशेष अभिनंदन केले जात आहे.

अनुकंपा तत्वावर नियुक्तीचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

भरतीच्या अनुषंगाने नियुक्ती प्राधिकाऱ्यांची बैठक ; अनुकंपा भरतीचा १५० दिवस विशेष मोहिमेत समावेश

प्रतिनिधी/वर्धा

राज्य शासनाने १५० दिवसांच्या विशेष कार्यक्रमांतर्गत अनुकंपा नियुक्तीची कालमर्यादा निश्चित करून दिली आहे. विभागांनी या मर्यादेत अनुकंपा पदे निश्चित करून वेळेत पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी सर्व विभागांना दिले आहे.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश खताळे, जिल्हा नियोजन अधिकारी अनिरुद्ध राजूरवार यांच्यासह सर्व नियुक्ती प्राधिकारी, विभाग प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

राज्य शासनाच्या १५० दिवस विशेष कार्यक्रमांतर्गत अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र असलेल्या सर्व उमेदवारांना कालमर्यादेत नियुक्ती आदेश देण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने जिल्ह्यात जास्तीत जास्त अनुकंपा उमेदवारांना नियुक्ती देण्यासाठी आवश्यक कार्यवाही वेळेत करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी केल्या. अनुकंपा नियुक्तीसाठी शासनाने निर्धारीत केलेल्या वेळापत्रकानुसार अनुकंपा उमेदवारांची प्रतिक्षा सूची अद्ययावत करणे, उमेदवारांच्या विनंतीनुसार गट बदलण्याची कार्यवाही, अनुकंपा नियुक्तीसाठी उपलब्ध रिक्त पदांची परिगणना, गट ड मध्ये अनुकंपा नियुक्तीसाठी पदे पुनर्जिवित करण्याचे प्रस्ताव सादर करावयाचे आहे. ही सर्व प्रक्रिया दि. १५ ऑगस्ट पर्यंत पुर्ण करावी, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

त्यानंतर जिल्ह्याची गट क ची सामायिक प्रतिक्षासूची अद्ययावत केली जातील. तसेच नियुक्तीस उपलब्ध पदसंख्या प्रसिद्ध करण्यात येतील. नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या यादीप्रमाणे गट ड च्या पदावर नियुक्तीसाठी सिफारस केली जाईल. जिल्हाधिकाऱ्यांच्या सिफारसीनुसार गट ड ची मृत करण्यात आलेली पदे नियुक्ती देण्यासाठी पुनर्जीवित करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येतील. ही प्रक्रिया दि. २२ ऑगस्ट पुर्वी पुर्ण करण्यात येणार आहे.

अनुकंपा उमेदवारांचा दि. १ सप्टेंबर रोजी मेळावा घेण्यात येणार आहे. त्यात उमेदवारांची नियुक्तीसाठी सिफारस करण्यात येतील. त्यापुर्वी विभागाच्यावतीने गट ड ची मृत पदे पुनर्जीवित करण्याची कार्यवाही पुर्ण करण्यात येणार आहे. दि. १५ सप्टेंबर रोजी गट क च्या व पुनर्जीवित केल्या गट ड च्या सिफारस केलेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येणार आहे. याप्रमाणे शासनाने निर्धारीत केल्याप्रमाणे विभागाने कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी केल्या आहे.

अनुकंपा नियुक्तीस पात्र असलेल्या उमेदवारांना अनुकंपा नियुक्तीचा शासनाचा कार्यक्रम त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यात यावा. यापुर्वी ज्यांची नियुक्तीची संधी हुकली आहे, त्यांचा यावेळी नियुक्ती प्रक्रियेत समावेश करण्यात यावा. राज्य शासनाच्या १५० दिवस कार्यक्रमातील हा अतिशय प्राधान्याचा उपक्रम आहे. त्यामुळे प्रत्येक विभागाने याबाबत गांर्भियाने कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

हिंदी विश्वविद्यालयातील विद्यार्थ्यांना मिळाली चीन मध्ये अध्ययन करण्याची संधी

प्रतिनिधी/वर्धा

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाच्या भाषा विद्यापीठांतर्गत इंग्रजी व विदेशी भाषा अध्ययन विभागातील चिनी भाषा पदवी अभ्यासक्रम (२०२२-२६) मधील पाच विद्यार्थ्यांना चायनीज स्कॉलरशिप कौन्सिलच्या माध्यमातून चीनमधील चार विद्यापीठांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी अध्ययनाची संधी मिळाली आहे.

उत्तर प्रदेशातील आजमगढ जिल्ह्यातील रसपूर गावची विद्यार्थिनी अस्मिन जायसवाल हिला क्वांगतोंग फॉरेन स्टडीज युनिव्हर्सिटीमध्ये, बिहारमधील मुंगेर जिल्ह्यातील बहादुर नगर गावचे कन्हैया कुमार यांना लांचोउ चिआओथॉंग युनिव्हर्सिटीमध्ये, पश्चिम चंपारण जिल्ह्यातील मौलनियाँ गावचे रजनीश कुमार यांना युनान युनिव्हर्सिटीमध्ये, तर बिहारमधील नवादा जिल्ह्यातील गाझीपूर गावचे विकास कुमार व उत्तर प्रदेशातील लखनौच्या महिबुलपूर गावची कु. निधी पाठक यांना पेकिंग लँग्वेज अँड कल्चर युनिव्हर्सिटीमध्ये अध्ययनाची संधी प्राप्त झाली आहे. ही माहिती चिनी भाषा विभागातील सहायक प्रोफेसर डॉ. अनिर्बाण घोष यांनी दिली.

या पाचही विद्यार्थ्यांनी हिंदी विश्वविद्यालयात चिनी भाषेच्या चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला होता. मात्र, तीन वर्षांच्या अभ्यासदरम्यान त्यांना चीनमधील विद्यापीठांमध्ये प्रत्यक्ष अध्ययनाची संधी उपलब्ध झाली आहे. या विद्यार्थ्यांचे वर्ग चीनमधील संबंधित विद्यापीठांमध्ये सप्टेंबर महिन्यापासून सुरू होतील.

यापूर्वी विभागातील चिनी भाषा शोधार्थी व पश्चिम बंगालमधील राणीगंजचे रहिवासी इंद्रजीत मिश्रा आणि विकास कुमार यांना शांघाय पॉलिटिकल सायन्स अँड लॉ युनिव्हर्सिटीमध्ये १२ ते २५ एप्रिल २०२४ या कालावधीत १४ दिवसांच्या 'समर कॅम्प' कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळाली होती.

एचआयव्ही मार्गदर्शन सम्पंन्न



तळेगाव/ प्रतिनिधी

आर्वी तहसील येथील सावळापूर ग्रामपंचायत येतें मिटींग घेहून सर्व पदाधिकारी व कर्मचारी व नोबल शिक्षण संस्था लिंक वर्कर प्रकल्पाची माहिती सुचिता बोभाटे यांनी एच आय व्ही हा विषय फार गंभीर असून त्यावर गाव पातळीवर जनजागृती होणे गरजेचे आहे हे सांगून गाव पातळीवर लिंक वर्कर चे कार्य समजून सांगण्यात आले व या कार्यक्रम चे नियोजन सौ .कोमल जवादे .यांनी केले व सहकार्य अर्चना मोकदंम. माया देशमुख.कुमारी मीना ढोके. मनीषा अतिश मेश्राम.या वेळेस उपस्थित होते

संरक्षण दलातील कर्मचारी आणि माजी सैनिकांच्या पाल्यांकडून अर्ज आमंत्रित

प्रतिनिधी/वर्धा

संरक्षण दलातील कर्मचारी आणि माजी सैनिकांच्या पाल्यांसाठी केंद्रीय पूल कोट्याअंतर्गत एमबीबीएस आणि बीडीएस जागांवर प्रवेश देण्यात येणार आहे. त्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

आजी, माजी सैनिक व विधवा पत्नीच्या पाल्यांसाठी दरवर्षी, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाद्वारे संरक्षण मंत्रालयाला पात्र अवलंबितांसाठी विशिष्ट संख्येने एमबीबीएस आणि बीडीएस जागा दिल्या जातात. केंद्रीय सैनिक बोर्ड या जागांचे वाटप आंतर-सेवा प्राधान्य आणि आरक्षण मार्गदर्शक तत्त्वांनुसार तयार केलेल्या गुणवत्ता यादीच्या आधारे निश्चित करते.

केंद्रीय सैनिक बोर्डाची वेबसाइट दुरुस्तीकरीता असल्यामुळे या जागांसाठी अर्ज उददुत इदेस्े द्वारे ऑनलाइन स्वीकारले जाणार आहे. सदर अर्ज भरण्यासाठी ू ्ुदन.ग्ह आणि ुग्र्ीुदन.ग्ह. या लिंकवर उददुत इदेस्े मध्ये आवश्यक कागदपत्रे आणि अर्जदाराच्या माहितीबाबत सविस्तर माहिती दिली आहे. आवश्यक कागदपत्रंसह अर्ज अपलोड करण्याची अंतिम दि. १५ ऑगस्ट आहे. उमेदवारांची निवड एनटीएद्वारे घेण्यात आलेल्या नीट -२०२५ मध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे केली जाईल.

वैद्यकीय आणि दंत महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी संरक्षण दलातील सैनिकांच्या खालील श्रेणीतील पुत्र, कन्या, विधवा, पत्नी यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत आहे. प्रत्येक श्रेणीनुसार प्राधान्यक्रमानुसारः युद्धात शहीद झालेल्या संरक्षण दलातील सैनिकांच्या विधवा, पाल्य, युद्धात अपंग झालेले आणि सेवेतून बाहेर काढलेल्या सैनिकांचे पाल्य, सेवेत असताना मृत्यू झालेल्या, ज्यांच्या मृत्यूचे कारण लष्करी सेवेशी संबंधित आहे, अशा संरक्षण दलातील सैनिकांच्या विधवा, पाल्य, सेवेत असताना अपंग झालेले आणि लष्करी सेवेशी संबंधित अपंगत्वामुळे सेवेतून बाहेर काढलेल्या सैनिकांचे पाल्य, माजी सैनिक आणि सेवारत सैनिक ज्यांना शौर्य पुरस्कार मिळाले आहेत त्यांचे पाल्य, माजी सैनिकांचे पाल्य, युद्धात अपंग झालेल्या आणि सेवेतून बाहेर काढलेल्या संरक्षण दलातील सैनिकांच्या पत्नी, सेवेत असतांना अपंग झालेल्या आणि लष्करी सेवेशी संबंधित अपंगत्वामुळे सेवेतून बाहेर काढलेल्या सैनिकांच्या पत्नी आणि माजी सैनिक व सेवारत सैनिक ज्यांना शौर्य पुरस्कार मिळाले आहेत त्यांच्या पत्नी, सेवारत सैनिकांचे पाल्य, सेवारत सैनिकांच्या पत्नी, नागरिकांचे पाल्य पात्र राहणार नाही.

माजी सैनिक व विधवा पत्नी यांच्यासाठी आरएसबी, झेडएसबीद्वारे रीतसर स्वाक्षरी केलेले पात्रता प्रमाणपत्र, सेवारत सैनिकांसाठी आणि प्राधान्य ह्न, ह्नघ्, ह्नघ्घ् आणि ई साठी ण्द्/ध्घ् युनिटद्वारे स्वाक्षरी केलेले प्रमाणपत्र, तसेच आवश्यक कागदपत्रे आणि उमेदवाराचा फोटो अपलोड करणे आवश्यक आहे. गुणवत्ता यादीच्या आधारे निवडलेल्या अर्जदारांना समुपदेशनासाठी बोलावले जाईल. जिल्ह्यातील सर्व पात्र माजी सैनिक आणि विधवा महिलांनी अंतिम मुदतीपूर्वी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी संकेतस्थळाला भेट द्यावी, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी श्रीपती मोरे यांनी कळविले आहे.

मोठा ताजबाग येथे मोफत रोग निदान शिबीराचे आयोजन



नागपूर, दिलीप येवलेः-

हजरत बाबा सय्यद मोहम्मद ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह यांचा १०३ व्या वार्षिक उर्सेला मोठा ताजबाग येथे सुरवात झालेली आहे. ताजुद्दीन बाबा यांचा दर्शनासाठी मोठी गर्दी उसळलेली आहे. फैजाने ताजुल ओलिया ओल्ड इज होम द्वारा निशुल्क रोग निदान व मोफत औषधे वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. ऊर्स काळात हे शिबिर २४ तास नागरिकांच्या सेवेसाठी असणार आहे यावेळी फैजानी ताजुल औलिया मौलाना इर्शाद यांच्या मार्गदर्शनात संस्थेद्वारे विविध उपक्रम चालत आहे. यावेळी कार्यक्रमाला डॉ. निखिल भुते, वरिष्ठ पत्रकार दिलीप येवले, डॉक्टर सोहेल अन्सारी, डॉक्टर गजाला पठाण, डॉक्टर सारा खान, डॉक्टर नूरीन खान आदी उपस्थित राहून परिश्रम घेत आहे.

सुधारित प्रधानमंत्री पिक विमा योजनेसाठी अधिकाधिक शेतकऱ्यांची नोंदणी करावी ;जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांचे निर्देश

नागपूर, दिलीप येवले

सुधारित प्रधानमंत्री पिक विमा योजनेसाठी नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा प्रतिसाद मोठ्या प्रमाणात घेण्यासाठी कृषी विभागातील अधिकारी, भारतीय कृषी विमा कंपनी, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक, तालुका पातळीवरील कृषी यंत्रणा यांनी गावोगावी जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधणे आवश्यक आहे. मागील वर्षाच्या तुलनेत २०२५-२६ मध्ये पिक विमा काढलेल्या शेतकऱ्यांची संख्या सद्यस्थितीत कमी असून या योजनेला असलेल्या मुदतीच्या आत अधिकाधिक शेतकऱ्यांच्या नोंदणीसाठी जबाबदारीने काम करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र मनोहरे व जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक, जिल्हा समन्वयक (सर्व बँक), जिल्हा समन्वयक, भारतीय कृषी विमा कंपनी नागपूर हे उपस्थित होते तसेच तालुका कृषी अधिकारी, तहसीलदार व तालुकास्तरीय विमा कंपनी प्रतिनिधी हे ऑनलाईन प्रणाली द्वारे उपस्थित होते.

तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी यांनी सहाय्यक कृषी अधिकारी व बँकेमार्फत मोहीम स्वरूपात विमा अर्ज वाढवण्यासाठी प्रती दिन प्रति सहाय्यक कृषी अधिकारी ५० शेतकरी याप्रमाने जबाबदारी निश्चित करण्यात आली. पुढील ६ दिवसा मध्ये ३०० शेतकरी याप्रमाने लक्षांक देऊन प्रत्येक उप कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी यांच्या मार्फत कार्यवाही करण्याचे जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांनी निर्देश दिले.

अग्रणी बँक व सरव्यवस्थापक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांनी कर्जदार शेतकरी यांचा पिक विमा काढण्याची मोहीम घेण्यास त्यांनी सांगितले. जिल्हा समन्वयक भारतीय कृषी विमा कंपनी नागपूर यांनी तात्काळ आपल्या वरिष्ठांशी चर्चा करून तालुका निहाय कार्यालय स्थापन करावीत व विमा अर्ज वाढवण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावरील अधिकारी कर्मचारी यांच्याशी समन्वय ठेऊन सहभागी व्हावे असे जिल्हाधिकारी यांनी निर्देश दिले. शेतकरी बांधवांनी या योजनेत सहभागी होऊन योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मा जिल्हाधिकारी यांनी केले.

डॉ. प्रदीप यांची SWAYAM पोर्टलवरील MOOCs अभ्यासक्रम निर्मितीसाठी अभ्यासक्रम समन्वयकपदी नियुक्ती

प्रतिनिधी/वर्धा

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा येथील संस्कृत साहित्य विभागात कार्यरत सहायक प्रोफेसर डॉ. प्रदीप यांची विश्वविद्यालय अनुदान आयोग (यूजीसी), नवी दिल्ली द्वारे ऍ्रिश्र पोर्टलवरील पदव्युत्तर स्तरावरील श्ध्ध्ये अभ्यासक्रमाच्या निर्मितीसाठी अभ्यासक्रम समन्वयक (ण्दलै ण्ददे्र्हूंदे) म्हणून नियुक्ती करण्यात आली. ही नियुक्ती यूजीसीच्या विषयतज्ज्ञ समितीने त्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता, संशोधननिष्ठा आणि विषयविशेष ज्ञान यांचा विचार करून केली आहे. डॉ. प्रदीप द्वारा द्वारे प्रस्तावित अभ्यासक्रमाचा विषय आहे 'भारतीय सौंदर्यशास्त्र : आचार्य अभिनवगुप्त यांच्या दृष्टिकोनातून' या विषयावर आधारित असून, हा अभ्यासक्रम



पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी तयार केला जात आहे. हा अभ्यासक्रम भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या राष्ट्रीय डिजिटल शिक्षण उपक्रमाअंतर्गत विकसित करण्यात येणार असून तो ऍ्रिश्र पोर्टलवर उपलब्ध होईल. या अभ्यासक्रमात आचार्य अभिनवगुप्त यांच्या काश्मीर शैव दर्शनावर आधारित सौंदर्यतत्त्वज्ञानाचे आधुनिक शिक्षणपद्धतीनुसार सादरीकरण केले जाईल.

या नियुक्तीबद्दल विश्वविद्यालयाच्या कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा यांनी डॉ. प्रदीप यांचे अभिनंदन करताना म्हणाल्या की डॉ. प्रदीप यांची ही नियुक्ती विश्वविद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे. ही उपलब्धी त्यांच्या शैक्षणिक क्षमतेची पावती असून, डिजिटल भारत अभियानात त्यांच्या सक्रीय सहभागाचे प्रतीक आहे.

विश्वविद्यालयाचे कुलसचिव प्रो. आनन्द पाटील यांनीही डॉ. प्रदीप यांना हार्दिक शुभेच्छा देत म्हटले की संस्कृत शिक्षणसाहित्य विद्यार्थ्यांपर्यंत डिजिटल माध्यमातून पोहोचवण्याच्या कामात डॉ. प्रदीप यांची भूमिका निश्चितच स्तुत्य ठरेल. त्यांच्या प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांना अभिनवगुप्त यांच्या सौंदर्यशास्त्राचे सखोल आकलन होईल.

या श्ध्ध्ये अभ्यासक्रमाचे निर्माण कार्य विश्वविद्यालय अनुदान आयोगाच्या सर्व शैक्षणिक, तांत्रिक व मूल्यांकन निकषांच्या अनुरूप केले जाईल. अभ्यासक्रमात निश्चित क्रेडिट संरचना (ण्ग्ू ऐल्ल्ूल्) अंतर्भूत करण्यात येईल, ज्यामुळे विद्यार्थी हा अभ्यासक्रम औपचारिक शिक्षणात समाविष्ट करू शकतील.

डॉ. प्रदीप यांची ही नियुक्ती संस्कृत साहित्य, भारतीय तत्त्वज्ञान आणि डिजिटल शिक्षण क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण टप्पा असून, ती तरुण अभ्यासक व शोधार्थ्यांना भारतीय ज्ञानपरंपरेचा सखोल अभ्यास करण्यासाठी प्रेरणा देणारी ठरेल. महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाचे शिक्षक विविध शैक्षणिक प्रकल्पांद्वारे सातत्याने संस्थात्मक व राष्ट्रीय शैक्षणिक क्षेत्रात मोलाची भूमिका बजावत आहेत. ही नियुक्ती विश्वविद्यालयासाठी निश्चितच अभिमानास्पद आहे.

किटकनाशके वापरतांना काळजी घेण्याचे आवाहन

प्रतिनिधी/वर्धा

कोणतेही किटकनाशक हे मनुष्यासह इतर जिविताकरीता अपायकारक प्रसंगी प्राणघातक असते. त्यामुळे पिकांवर किटकनाशकाची फवारणी करतांना काळजी घेणे आवश्यक आहे. किटकनाशकाच्या डब्यासह घडीपत्रिकेमध्ये दुष्परीणामावर करावयाच्या उपाययोजना छापलेल्या असतात. त्यांचे वाचन करुन सावधानी बाळगावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

किटकनाशके हाताळतांना रबरी मोजे घालावे. किटकनाशकाचे द्रावण तयार करतांना काठी किंवा डाव वापरुन पाण्यात निट मिसळावे. फवारणीचे द्रावण तयार करण्यापासून फवारणी पुर्ण होईपर्यंत डोळ्यावर चष्मा, हातामध्ये रबरी हातमोजे व तोंडावर मास्क अथवा उपरणे गुंडाळणे आवश्यक आहे. सर्दी, पडसे व ताप असल्यास फवारणी करु नये. फवारणीचे काम बालकावर सोपवू नये. फवारणी वारा शांत असतांना व वाऱ्याच्या दिशेने सकाळी किंवा सायंकाळी करावी. तीव्र उन्हात किंवा हवा असतांना करु नये.

फवारणीचे द्रावण तयार करण्यापासून पुर्ण होईपर्यंत फवारणी करणाऱ्या व्यक्तीने खाणे, पिणे, तंबाखू, धुम्रपान करु नये. कृषि विद्यापिठ तसेच उत्पादक कंपनीने शिफारस केलेल्या मात्रेप्रमाणेच किटकनाशकाचे द्रावण तयार करावे. कोणत्याही परिस्थितीत किटकनाशकाचे प्रमाण वाढणार नाही, याची काळजी घ्यावी. फुटलेले किंवा मोडके स्त्रेपंप वापरु नये. चांगल्या प्रतिचा पंप व नोझल वापरावे. फवारणी शरीरापासून लांबवर करण्याची काळजी घ्यावी. नोझल साफ करतांना फुंकर मारु नये. फवारणी झाल्यानंतर साबनाने हात स्वच्छ धूवावे. डोके दुखणे, घाम येणे, मळमळ इत्यादी लक्षणे दिसल्यास फवारणी तत्काळ थांबवावी व फवारणी न झालेल्या मोकळ्या जागेवर सावलीमध्ये बसावे.

किटकनाशकासोबत दिलेल्या घडीपत्रिकेमध्ये दिलेली उपाययोजना करावी. त्रास होणाऱ्या व्यक्तीस मिठाच्या पाण्याचे द्रावण पिण्यास दिल्यास उलटीवाटे विष बाहेर पडते. डोळे चुरचुरत असल्यास चुकूनही डोळ्यांना हात लावू नये. बशीमध्ये स्वच्छ पाणी घेऊन त्यात डोळा बुडवावा व डोळ्याची उघडझाप करावी. असे पाणी बदलवून दोन तिन वेळा करावे व जवळच्या डॉक्टरकडे तत्काळ उपचार घ्यावा. डॉक्टरांना घडीपत्रिका व किटकनाशकाचा डबा दाखवावा, असे कृषि विकास अधिकारी संजय बमनोटे यांनी कळविले आहे.

वैयक्तिक योजनेच्या लाभार्थ्यांनी कागदपत्रे जमा करण्याचे आवाहन

नागपूर, दिलीप येवले

महाराष्ट्र शासनाद्वारे विशेष सहाय्य योजनेअंतर्गत राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या वैयक्तीक लाभाच्या योजना नागपूर शहर मनपा क्षेत्रामध्ये राबविण्यात येत आहे. नागपूर शहरातील ज्या लाभार्थ्यांना उपरोक्त योजनांचा लाभ सुरु आहे अशा लाभार्थ्यांना सुचित करण्यात येते की. यापूढे मिळणारे अनुदान हे फक्त ऊँऊ प्रणालीद्वारेच पाठविण्याबाबत कळविले आहे. तसेच नागपूर महानगरपालिका येथे शिबीर आयोजित करुन सुद्धा ब-याच लाभार्थीनी आजपावेतो मंजुरी आदेश टोकन, आधार कार्ड, बँक पास बुक, मोबाईल क्रमांक, विधवांसाठी पतीचे मृत्युचा दाखला इतर बिमारीसाठी वैद्यकीय प्रमाणपत्र व दिव्यांग लाभार्थी प्रमाणपत्र जमा केलेले नाही तरी आपण तात्काळ आपले जवळचे मनपा झोन कार्यालय निहाय नियुक्त तलाठी यांचेकडे किंवा बचत भवन जिल्हाधिकारी कार्यालय येथे दिनांक २८/७/२०२५ ते १६/८/२०२५ पर्यंत कागदपत्र जमा करावे. जेणेकरुन आपणास संगांयो चा वेळेत लाभ देण्याची कार्यवाही करता येईल,असे निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे यांनी स्पष्ट केले आहे.

भारतीय शिक्षण मंडळाच्या वतीने व्यास पूजा उत्सवाचे भव्य आयोजन

प्रतिनिधी/वर्धा

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयातील भारतीय शिक्षण मंडळाच्या विद्यापीठ शाखेद्वारे गालिब सभागृहात व्यास पूजा उत्सवाचे भव्य आणि मंगलमय आयोजन २४ जुलै रोजी करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाली. कार्यक्रमाच्या प्रारंभी शोधार्थी प्रिया माळीने भारतीय शिक्षण मंडळाचा ध्येय श्लोक सादर केला, तर ध्येय वाक्यचे पठण शिक्षण विभागाचे शोधार्थी आनंद साहू यांनी केले. विश्वविद्यालय इकाईचे अध्यक्ष प्रो. अवधेश कुमार यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना मांडली. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून विश्वविद्यालयाच्या कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा उपस्थित होत्या. त्यांनी गुरु-शिष्य परंपरेवर सविस्तर प्रकाश टाकत भारतीय ज्ञान परंपरेची ऐतिहासिक आणि समकालीन प्रासंगिकता अधोरेखित केली. त्यांनी सांगितले की भारतातील ऋषी-मुनींची परंपरा ही केवळ शिक्षणपुरती मर्यादित नसून ती संस्कार आणि जीवनदृष्टिकोनाची वाहक राहिली आहे.

विदर्भ प्रांताचे मंत्री प्रो. राजेश सिंगरू यांनी व्यास पूजेची परंपरा, उद्देश आणि सांस्कृतिक महत्त्व यावर सविस्तर भाष्य केले. ते म्हणाले की हा उत्सव केवळ धार्मिक विधी नसून ज्ञान, श्रद्धा आणि गुरूप्रती कृतज्ञतेचा प्रतीक आहे.

विदर्भ प्रांत अध्यक्ष प्रो. अखिलेश पेशवे यांनी विश्वविद्यालय शाखेतील नवीन जबाबदाऱ्या जाहीर केल्या. यावेळी प्रो. प्रीती सागर, शाखा उपाध्यक्ष, प्रो. दिगंबर तंगलवाड, उच्च शिक्षण गतिविधी प्रमुख, डॉ. जयंत उपाध्याय, मंडळ कार्य विभाग प्रमुख, डॉ. मनोज राय, भारतीय भाषा गतिविधी प्रमुख, डॉ. हरीश पांडे, भारतीय ज्ञान संपदा गतिविधी प्रमुख, डॉ. राम अवध, शिक्षण तंत्रज्ञान गतिविधी प्रमुख तर अंबरेश कुमार शुक्ल यांना विद्यालय शिक्षण गतिविधीचे दायित्व सोपविण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. गौरी शर्मा यांनी केले तर समारोप प्रसंगी जे ओमप्रकाश यांनी कल्याण मंत्र सादर केला. या वेळी भारतीय शिक्षण मंडळाचे अखिल भारतीय पदाधिकारी मंडळ कार्य विभागाचे सह-प्रमुख डॉ. शिव सिंह बघेल उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रो. जनार्दन तिवारी, डॉ. नरेंद्र पाल, डॉ. गौरी शर्मा, डॉ. रेणु सिंह, श्री. कमल शर्मा, डॉ. अभिषेक सिंह, डॉ. आदित्य चतुर्वेदी तसेच कार्यकारिणी सदस्य, विश्वविद्यालयाचे शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी तसेच केंद्रीय विद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा उत्सव गुरु परंपरेच्या जतनासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरला.

प्राचार्यांचे निवृत्ती वय ६५ करण्यासाठी सकारात्मक : उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील



नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करा

वृत्तसंस्था/अमरावती

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या प्रभावी अंमलबजावणीत प्राध्यापक आणि प्राचार्यांची भूमिका महत्त्वपूर्ण असून, देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांनी धोरणाचे सर्व पैलू समजून घ्यावेत. प्राचार्यांच्या मागणीनुसार, त्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६२ वरून ६५ वर्षे करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय लवकरच घेतला जाईल, असे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी आज येथे केले.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित अखिल महाराष्ट्र फेडरेशन ऑफ प्रिन्सिपल असोसिएशन ऑफ नॉन-गव्हर्नमेंट कॉलेजेसच्या ४० व्या वार्षिक राज्यस्तरीय अधिवेशनाचे उद्घाटन मंत्री पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार किरण सरनाईक, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते, उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक शैलेंद्र देवळाणकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले की, जगात सर्वात मोठा तरुणांचा देश म्हणून भारताची ओळख आहे. पारंपरिक शिक्षणाऐवजी व्यावसायिक आणि प्रात्यक्षिक-आधारित शिक्षणाची आज गरज आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ही गरज पूर्ण करेल. विद्यार्थी हित जोपासून शिक्षण क्षेत्रात महाराष्ट्राला अग्रस्थान मिळवून देण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना संशोधनाच्या संधी उपलब्ध करून देणे, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून आधुनिक अभ्यासक्रम तयार करणे आणि मातृभाषेतून शिक्षण देणे आवश्यक आहे. अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना कारखान्यात प्रात्यक्षिक प्रशिक्षण आणि सायंकाळी सैद्धांतिक अभ्यास अशी शिक्षण पद्धती राबवली जावी. यामुळे रोजगारनिर्मिती आणि संशोधनाला चालना मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

२०४७ पर्यंत सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट

मंत्री पाटील यांनी सांगितले की, २०४७ पर्यंत भारताला सर्व क्षेत्रात अग्रेसर करण्यासाठी युवा पिढीला संधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे हे उद्दिष्ट साध्य होईल. बेरोजगारी संपवून प्रत्येकाच्या हाताला काम देणे, यातूनच आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक प्रगती शक्य होईल, असे त्यांनी नमूद केले.

मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन

राज्य शासन मुलींना पहिली ते पदवीपर्यंत मोफत शिक्षण देत आहे. ८४२ अभ्यासक्रमांचे शुल्क माफ करण्यात आले आहे. यात ट्यूशन आणि परीक्षा शुल्काचा समावेश आहे. येत्या काळात इतर शुल्काची प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय घेतला जाईल. यामुळे मागील वर्षी व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या मुलींची संख्या ५३ हजारांनी वाढली आहे. विद्यार्थ्यांना सर्व क्षेत्रात करिअरच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन सर्वतोपरी सहाय्य करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती

विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी मुख्यमंत्री यांनी ५,५०० नवीन प्राध्यापक आणि २,९०० शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरतीला मान्यता दिली आहे. तसेच, १९९३ पासून प्रलंबित असलेला एम.फिल, नेट/सेट बंधनकारक प्रश्न निकाली काढण्यात आला असून, यासाठी सुमारे १ हजार कोटी रुपये वितरित केले जातील. असोसिएट प्रोफेसर ते प्रोफेसर पदोन्नतीचा प्रश्नही लवकरच सोडवला जाईल, असे पाटील यांनी सांगितले.

यावेळी अधिवेशनानिमित्त तयार केलेल्या स्मरणिकेचे विमोचन आणि उद्योग विभागाशी संबंधित 'आय हेल्प'वेब पोर्टलचे उद्घाटन मंत्री पाटील यांच्या हस्ते झाले.

या समारंभात लक्ष्मीनारायण इनोव्हेशन टेक्नॉलॉजी विद्यापीठ, नागपूरचे कुलगुरु डॉ. अतुल वैद्य, उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. केशव तुपे, एनसीएल सुकाणू समितीचे सदस्य सीए अनिल राव, अखिल महाराष्ट्र फेडरेशन ऑफ प्रिन्सिपल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आबासाहेब देशमुख, उपाध्यक्ष प्राचार्य नंदकुमार निकम, सचिव डॉ. सुधाकर जाधवर, प्राचार्य स्मिता देशमुख आदी यावेळी उपस्थित होते.

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचे दादासाहेब गवई यांना अभिवादन

वृत्तसंस्था/अमरावती



भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी दारापूर येथे आज त्यांचे वडील रा. सु. उपाख्य दादासाहेब गवई यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या स्मृतीस्थळी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

दारापूर येथे डॉ. दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने स्मृतिशेष दादासाहेब गवई यांच्या स्मृतीदिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. खासदार बळवंत वानखडे, सरन्यायाधीश न्या. भूषण गवई यांच्या मातोश्री कमलताई गवई, संस्थेच्या अध्यक्ष कीर्ती गवई अर्जून, तेजस्विनी गवई, संस्थेचे सदस्य डॉ. राजेंद्र गवई, तक्षशिला अभियांत्रिकी महाविद्यालय दारापूरचे प्राचार्य डॉ. डी. टी. इंगोले, धरम गवई आदी यावेळी उपस्थित होते.

दारापुर फाटा येथे उभारल्या जाणाऱ्या दारापूर गावाचे प्रवेशद्वार श्री. दादासाहेब गवई यांच्या स्मृतिद्वाराच्या बांधकामाचे भूमिपूजन सरन्यायाधीश न्या. गवई यांचे हस्ते यावेळी करण्यात आले.

त्यानंतर तक्षशिला अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या परीसरातील दादासाहेबांच्या स्मृतीस्थळावर अभिवादन करण्यात आले. तक्षशिला अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या परिसरातील इनडोअर स्टेडियममध्ये दादासाहेब गवई यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. यावेळी सामूहिक बुद्धवदंना करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन सचिव डॉ. कमलाकर पायस यांनी तर आभार अधीक्षक सचिन पंडित यांनी मानले.

माण-खटाव तालुक्यातील विविध विकास कामांचा ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी घेतला आढावा

वृत्तसंस्था/सातारा



माण तालुक्यातील भोजलिंग, टाकेवाडी, वारुगड येथील वन विभागाच्या हद्दीतील रस्ते करण्यासाठी निधी प्राप्त आहे, तरी वन विभागाने परवानगीचा विषय त्वरीत मार्गी लावावा, असे निर्देश ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

माण खटाव तालुक्यातील विविध विकास कामांसंदर्भात मंत्री श्री. गोरे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेतली. यावेळी आमदार अतुल भोसले, जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संतोष रोकडे, उपवनसंरक्षक अमोल सातपुते, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीपाद जाधव, राहूल अहिरे, जिल्हा परिषदेचे बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमर नलावडे आदी उपस्थित होते.

या बैठकीत खटाव तालुक्यातील कटगुण आणि भोसरे येथील पर्यटन विकास आराखडे तात्काळ जिल्हा नियोजन समितीकडे सादर करावेत. माण तालुक्यातील शिंगणापूर, म्हसवड तर खटाव तालुक्यातील सिद्धेश्वर कुरोली आणि पुसेगाव यांचे ब वर्ग तिर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी प्रस्ताव शासनाकडे सादर करावेत, असे निर्देश मंत्री श्री. गोरे यांनी दिले.

माण तालुक्यातील आंधळीचे महालक्ष्मी मंदिर व पांगारीचे बिरोबा मंदिर व फलटण तालुक्यातील मरुम येथील मल्हारराव होळकर यांचे जन्म स्थळ या यात्रास्थळांना क वर्ग यात्रा स्थळाचा दर्जा प्राप्त व्हावा यासाठी जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव सादर करण्याबाबतही त्यांनी संबंधितांना निर्देश दिले.

यावेळी माण व खटाव तालुक्यातील पाझर तलावांचा गाळ काढण्याचे काम हाती घेण्यात येईल. त्यासाठी जिल्हा नियोजन सर्व साधारण योजनेततून इंधनासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा, असेही त्यांनी जिल्हाधिकारी यांना सांगितले.

गडचिरोलीत पाच हजार लाभार्थी कुटुंबासाठी 'उपजीविका विकास कार्यक्रम' राबविण्यात येणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

वृत्तसंस्था/मुंबई



गडचिरोली जिल्ह्यातील आकांक्षित तालुक्यांच्या सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नातून 'उपजीविका विकास कार्यक्रम' राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत ४९ गावांचा समावेश असून यात अ?ॅक्सिस बँक फाउंडेशनचा सक्रिय सहभाग असणार आहे. १ जानेवारी २०२५ पासून हा प्रकल्प राबविण्यास सुरुवात करण्यात आली असून या उपक्रमासाठी आगामी तीन वर्षासाठी २०.३४ कोटी रूपये इतकी तरतूद करण्यात आली आहे. या माध्यमातून पाच हजार लाभार्थी कुटुंबांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल.

गडचिरोली जिल्ह्यातील स्थानिकांचे जीवनमान उंचावणे आणि स्थानिकांना रोजगाराच्या संधी देण्यास शासन प्राधान्य देत आहे. शासनाच्या या धोरणाला प्रतिसाद देत अ?ॅक्सिस बँक फाउंडेशनच्या सक्रिय सहभागातून गडचिरोलीत उपजीविका विकास कार्यक्रमांतर्गत काम सुरू झाले आहे. हवामानाशी सुसंगत शाश्वत शेतीला प्रोत्साहन देऊन, उपजीविकेत सुधारणा करणे, नागरिकांचे जीवनमान ऊंचावून समुदायाचे कल्याण साधणे हे प्रमुख उद्दिष्टे या प्रकल्पात पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी मुख्य उपक्रमांतर्गत शेती आधारित उपजीविका, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, शेतीतर उपजीविका हस्तक्षेप, सामूहिक उद्योजकता, आरोग्य आणि पोषण या बाबींवर लक्ष देण्यात येईल.

३० जून २०२५ पर्यंत या उपक्रमात २,००० कुटुंबांची नोंदणी झाली आहे. एकूण ६६ बोडींचे गाळमुक्तीकरण करून त्यांच्या जलधारण क्षमतेत वाढ करण्यात आली आहे. बोडी आधारित शेती प्रणालीत माशांचे संगोपन, त्यावर कुक्कुटपालन आणि त्याच पाण्याचा वापर पिकांना दिला जातो. ही पद्धत शेती उत्पादकतेत वाढ करुन ग्रामीण कुटुंबांसाठी उत्पन्नाचे विविध मार्ग उपलब्ध करून देते.

२०२७-२८ पर्यंत या प्रकल्पांद्वारे सहभागी कुटुंबांना लाभ होईल. त्यांच्या मूळ उत्पन्नाच्या तुलनेत उत्पन्न दुप्पट होईल. तसेच शेती उत्पादकता वाढवून उपजीविकेच्या संधी उपलब्ध होतील. शेतकरी गटांच्या माध्यमांतून सामूहिक खरेदी-विक्री व्यवस्था निर्माण होईल, तसेच पोषण आणि आरोग्य विषयक जनजागृतीमुळे जीवनमानात लक्षणीय सुधारणा होण्यासही सुरुवात होईल.

'झाडांचे संगोपन म्हणजे आईच्या आठवणींना जपणे' : पालकमंत्री गुलाबराव पाटील

'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत पाळधी शाळेत वृक्षारोपण कार्यक्रम

वृत्तसंस्था/जळगाव



'आई ही प्रत्येकाच्या जीवनातील पहिली गुरु आणि पहिली सावली असते. झाडांचे संगोपन म्हणजे आईच्या आठवणींना जपणे. झाडांमुळे मिळणारा प्राणवायू किती महत्त्वाचा आहे, हे आपण हॉस्पिटलमध्ये अनुभवतो,' असे प्रतिपादन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी आज येथे केले.

ते 'एक पेड माँ के नाम' या राज्यभर राबविण्यात येत असलेल्या पर्यावरणपूरक आणि भावनिक उपक्रमांतर्गत पाळधी (ता. धरणगाव) येथील केंद्रीय जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात बोलत होते. या वेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या हस्तेही वृक्षारोपण करण्यात आले.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती करनवाल म्हणाल्या की, 'प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आईच्या नावाने एक झाड लावून त्याचे संगोपन करावे. 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमात जळगाव जिल्हा राज्यात आघाडीवर असून, ही आपल्या सर्वांची गौरवाची बाब आहे.'

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पर्यावरण रक्षण विषयक गीताने झाली. यानंतर शाळेच्या परिसरात फळझाडे व छायादायक वृक्षांची लागवड करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्रप्रमुख प्रमोद सोनवणे यांनी केले. सूत्रसंचालन उपशिक्षिका प्रतिभा पाटील यांनी केले, तर आभार मुख्याध्यापक एन. के. देशमुख यांनी मानले.

या प्रसंगी प्राथमिक शिक्षणाधिकारी सचिन परदेशी, उपशिक्षणाधिकारी एन. एफ. चौधरी, गटशिक्षणाधिकारी स्वाती हवेले, डॉ. भावना भोसले, सरपंच विजय पाटील, ग्रामविकास अधिकारी डी. डी. पाठक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, मदतनीस, ग्रामपंचायत सदस्य, पालक, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा परिषद शाळेचे केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि शालेय शिक्षण समिती यांच्या संयुक्त पुढाकाराने करण्यात आले.

गावाचा सर्वांगीण विकास हा ग्रामीण प्रगतीचा पाया : पालकमंत्री गुलाबराव पाटील

जळके व विटनेरमध्ये विविध विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन

वृत्तसंस्था/जळगाव



'गावांचा सर्वांगीण विकास, पायाभूत सुविधा, शिक्षण, महिला सशक्तीकरण आणि सांस्कृतिक प्रगती हेच ग्रामीण भागाच्या खऱ्या अर्थाने प्रगतीचे आधारस्तंभ आहेत,' असे प्रतिपादन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.

तालुक्यातील जळके व विटनेर येथे आयोजित कार्यक्रमात विविध विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन मंत्री पाटील यांच्या हस्ते पार पडले. जळके येथील वसंतवाडी गावाजवळ ?६० लक्ष निधीतून बांधलेल्या लोकल नाल्यावर संरक्षक भिंतीचे, जिल्हा परिषद शाळेच्या ?११.५० लक्ष निधीतून बांधलेल्या इमारतीचे, तसेच महादेव मंदिर परिसरात ?१० लक्ष निधीतून साकारलेल्या पेव्हिंग ब्लॉक व सुशोभीकरण कामांचे लोकार्पण करण्यात आले. यानंतर विटनेर येथील जिल्हा परिषद शाळेच्या ?११.५० लक्ष निधीतून उभारल्या जाणाऱ्या नवीन इमारतीचे भूमिपूजनही करण्यात आले.

या कार्यक्रमात कामगार महिलांना भांडी संच व शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले.


यावेळी बोलताना पालकमंत्री पाटील म्हणाले, 'गावच्या मातीशी माझे भावनिक नाते आहे. गावात मूलभूत सुविधा आणि स्वच्छतेसह दर्जेदार शिक्षण पोहोचवण्यासाठी शासन कटिबद्ध असून, गरजेनुसार निधी कमी पडू दिला जाणार नाही. आज फक्त इमारतींचे नव्हे, तर नव्या आशा-स्वप्नांचे लोकार्पण होत आहे. महिलांना दिलेले भांडी संच त्यांच्या कष्टमय जीवनात थोडी मदत ठरेल आणि विद्यार्थ्यांना दिलेल्या वह्या शिक्षणासाठी प्रेरणा देतील.'

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी. के. पाटील यांनी तर प्रास्ताविक दूध संघाचे संचालक रमेश पाटील यांनी केले. आभार प्रदर्शन सरपंच स्नेहा साठे यांनी केले.

या प्रसंगी जिल्हा परिषद माजी सदस्य पवन सोनवणे, उपजिल्हा प्रमुख रवी कापडणे, तालुका प्रमुख शिवराज पाटील, माजी उपसभापती साहेबराव वराडे, सरपंच स्नेहा साठे, माजी सरपंच नितीन जैन, वसंतवाडी सरपंच विनोद पाटील, उपसरपंच सोपान सूर्यवंशी, तंटामुक्ती अध्यक्ष दीपक पाटील, प्रवीण पाटील, ज्ञानेश्वर चव्हाण, विटनेर ग्रामपंचायत सदस्य रघुनाथ जाधव, योगेश गुंजाळ, सुरेश गोलांडे, सागर परदेशी, राजू परदेशी, श्यामसिंग परदेशी, भूषण पाटील, सरपंच राजूभैय्या पाटील, उपसरपंच सुशीलाबाई पाटील, कवीश्वर पाटील, सागर दिवाणे, नारायण पाटील, सुभाषवाडी सरपंच राजाराम राठोड, लोणवाडी सरपंच बाळू धाडी, वराड उपसरपंच राजू जाधव, अर्जुन पाटील, सचिन पाटील, जितेंद्र पाटील, संदीप सुरळकर, रामकृष्ण काटोले, मागासवर्गीय सेना तालुका उपाध्यक्ष सुनील ब्राम्हणे, महिला तालुका अध्यक्षा अनिता चिमणकरे तसेच मुख्याध्यापक, शिक्षक, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यात सहा जिल्ह्यांसह पुणे घाट, सातारा घाट परिसरात रेड अलर्ट

वृत्तसंस्था/मुंबई



राज्यात पुढील २४ तासासाठी रायगड, रत्नागिरी, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली या सहा जिल्ह्यांसह पुणे घाट, सातारा घाट परिसरात रेड अलर्ट देण्यात आला असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.

भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्रामार्फत मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना दि. २५ जुलै २०२५ सायंकाळी ५.३९ ते दि. २७ जुलै २०२५ रात्री ८.३० पर्यंत ४.१ ते ४.८ मीटर उंच लाटांचा इशारा देण्यात आला आहे. या कालावधीत लहान होड्यांना समुद्रास न जाण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. समुद्राची धूप आणि उंच लाटांचे तडाखे समुद्र किनारी येण्याचा इशारा देण्यात आला असून जिल्हा प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यातील जगबुडी नदी इशारा पातळी ओलांडली असून नागरीकांना सतर्कतेचा सूचना देण्यात आल्या आहेत. पवना धरण ८२.२१इ भरले असून पाणलोट क्षेत्रात पाऊस सुरू आहे पवना धरणातून १६०० क्युसेक्स पाणी नदीपात्रात सोडले जाऊ शकते त्या अनुषंगाने नागरिकांना सूचित करण्यात आले आहे.

मोडक सागर, मध्य वैतरणा, तानसा धरणातुन विसर्ग सुरू

मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यात पाणी पुरवठा करणाऱ्या मोडक सागर, मध्य वैतरणा आणि तानसा या धरणातुन अनुक्रमे ४४८८.२५, २०१२.६७ आणि ३३१५.२५ क्युसेक इतका विसर्ग सुरू आहे. आपत्तीच्या अनुषंगाने प्रशासनातफे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांना संभाव्य आपत्कालीन परिस्थितीत सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत, असे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242